रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १७१
www.ramprahar.com
सोमवार, ६ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मुरूडच्या पद्मदुर्गवर शिवशाही अवतरली!/२
शेकाप कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश/५
महाड मॅरेथॉनला धावपटूंचा प्रतिसाद/८

## ‘केजरीवालांच्या निवासस्थानावरील खर्च आपच्या भ्रष्टाचाराचा नमुना’

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्ष आणि पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानावर केलेला खर्च हा आपच्या भ्रष्टाचाराचा नमुना असल्याची टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. दिल्लीत भाजपच्या परिवर्तन मेळाव्यात बोलताना पंतप्रधान म्हणाले की, आज एका मोठ्या वृत्तपत्रात अरविंद केजरीवाल यांच्या शीश महालवर झालेल्या खर्चाचा तपशील देण्यात आला आहे. कॅगच्या अहवालात नमूद केलेल्या आकडेवारीवर ही बातमी आहे. कोरोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण देश झगडत होता. तेव्हा आम आदमी पक्ष शीश महाल बांधण्यात व्यस्त होता. नूतनीकरणासाठी सुरुवातीला ७.९१ कोटींचा खर्चाचा प्रस्ताव दिला गेला. नंतर हा खर्च वाढून २०२०मध्ये ८.६२ कोटींची तरतूद करण्यात आली, मात्र २०२२मध्ये जेव्हा नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले तेव्हा त्याची एकूण किंमत ३३.६६ कोटींवर गेली होती.



# बीडच्या घटनेवरून राजकारण नको!

## कुठल्याही दोषीला सोडणार नाही; मुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती

**नागपूर : प्रतिनिधी**

बीडमध्ये सरपंचांची झालेली हत्या हा गंभीरच प्रकार आहे, मात्र या घटनेवरून होत असलेले राजकारण दुर्दैवी आहे. या प्रकरणातून राजकारणाऐवजी समाजात सुधार व्हावा यादृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. चौकशी पूर्ण झाल्यावर कुठल्याही दोषीला सोडणार नाही, अशी स्पष्टोक्ती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ते रविवारी (दि. ५) नागपुरात ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



कुठल्याही मुद्द्यावरून सार्वजनिक ठिकाणी मोर्चे काढण्याचा सर्वांना अधिकार आहे. बीडच्या प्रकरणात सरकार आणि पोलीस पूर्ण क्षमतेने कारवाई करीत आहेत. या प्रकरणात कुणालाही वाचविण्याचा प्रयत्न झालेला नाही. जर कुणी तसा प्रकार केला तरी कुणालाही वाचवू देणार नाही. जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई होईल. जे दादागिरी करतात किंवा दहशत निर्माण करून जनतेत जरब बसविण्याचा प्रयत्न करतात त्यांच्यावर वचक बसविण्याचा प्रयत्न आहे. पोलिसांची योग्य कारवाई सुरू आहे. अंजली दमानिया यांची जी काही तक्रार असेल ती त्यांनी पोलिसांकडे करावी. त्यावर योग्य पावले उचलली जातील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### आरोपींना मदत करणाऱ्यांनाही सोडले जाणार नाही

आरोपी कुठेही गेले असतील व कुणीही मदत केली असेल तर कारवाई होत आहे. या प्रकरणात आरोपींना मदत करणाऱ्यांनाही सोडणार नाही. काही जण चौकशीच्या फेऱ्यात आले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची नीट चौकशी होऊ द्यावी. चौकशी पूर्ण झाल्यावर सरकार आणि पोलीस कुठल्याही दोषीला सोडणार नाही हा आमचा शब्द आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटले.

# पनवेलमध्ये भाजप सदस्य नोंदणी अभियान

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप महाराष्ट्र प्रदेश संघटन पर्वाच्या निमित्ताने रविवारी (दि ५) महापालिका प्रभाग क्रमांक १८मध्ये तसेच प्रदेश कामगार मोर्चाच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले. या अभियानाला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत आढावा घेतला तसेच पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.



महापालिका प्रभाग क्रमांक १८मध्ये झालेल्या सदस्य नोंदणी अभियानात प्रभागातील नागरिक, व्यापारीवर्ग, जेष्ठ नागरिक यांनी सहभाग नोंदवला. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील, सोशल मीडिया ओबीसी मोर्चा जिल्हा प्रभारी तथा शहर संयोजक प्रसाद हनुमंते, प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, ज्येष्ठ नागरिक सेल संयोजक उपेंद्र मराठे यांच्यासह भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र कामगार मोर्चाच्या वतीने आयोजित सदस्य नोंदणी अभियानावेळी कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, उपाध्यक्ष अनिल खोपडे, भारतीय जनरल कामगार मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र घरत, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते साताऱ्यात कवितासंग्रहाचे प्रकाशन

## कवी शशिकांत बडेकर यांना शुभेच्छा

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा येथील कवी शशिकांत बडेकर यांच्या ‘प्रतिक’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ४) करण्यात आले. या वेळी त्यांनी कवी बडेकर यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.



साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे झालेल्या कवितासंग्रहाचे प्रकाशनावेळी कॉलेजचे मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुभाष वाघमारे, अमोल उनउने आदी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, कवी शशिकांत बडेकर यांच्या कवितेत, निसर्ग, प्रेम, सामाजिक वास्तव व ऋणानुबंध इत्यादी विविध प्रकारचा आशय आलेला असून आयुष्यात वेदना असल्या तरी दुःखातूनसुद्धा माणसाने कसे बाहेर पडावे असा विचार आलेला आहे. बडेकर आशावादी कवी आहेत. (पान २ वर..)

# रायगड पोलिसांचा कारभार झाला स्मार्ट!

## सर्व पोलीस ठाण्यांना आयएसओ मानांकन

**अलिबाग : प्रतिनिधी**

जनसामान्यातील पोलिसांची प्रतिमा बदलण्याचे काम रायगड पोलीस दलाकडून सुरू झाले आहे. नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणी आणि उपविभागीय अधिकारी कार्यालये आता स्मार्ट झाली आहेत. या सर्वांना आयएसओ मानांकनदेखील प्राप्त झाले आहे.




पोलिसांच्या कामकाजाला आता तंत्रज्ञानाची जोड मिळाली असून पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत आणि बाह्यरूपात मोठे बदल करण्यात आले आहेत. त्याचबरोबर पोलीस दलाचे कामकाज ऑनलाईन, पेपरलेस झाले आहे. यामुळे कामाकाजात सुसूत्रता व पारदर्शकता येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व २८ पोलीस ठाणे स्मार्ट केली गेली आहेत. याबरोबरच आठ उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयांचा कारभारही स्मार्ट झाला आहे.

# पनवेलमध्ये हेल्थ एक्स्पो २०२५ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील गोखले हॉलमध्ये आरोग्यकिरण हेल्थ एक्स्पो २०२५चे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ४) झाले, तर आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. ५) या प्रदर्शनाला भेट देऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या.





आरोग्यकिरण आणि कृष्णा इव्हेंटच्या माध्यमातून आरोग्यकिरण हेल्थ एक्स्पो २०२५ हे प्रदर्शन ४ व ५ जानेवारीदरम्यान गोखले हॉलमध्ये भरवण्यात आले होते. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, आयोजक राष्ट्रीय चिकित्सा सेवारत्न सन्मानित प्रसिद्ध वैद्य नीरज दांडेकर, आदिती बेलोसे, अभिषेक पटवर्धन यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

हेल्थ एक्स्पोमध्ये आरोग्यासाठी आवश्यक भेसळरहित विविध उत्पादने आणि पदार्थांचे प्रदर्शन तसेच नागरिकांच्या उत्तम आरोग्याच्या भवितव्याकरिता प्रसिद्ध वैद्य नीरज दांडेकर यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्यांनी बाल आरोग्य रहस्य, कॉर्पोरेट जीवनशैली तसेच आयुर्वेद आणि स्वयंपाकगृहाचे आरोग्य या विषयावर माहिती दिली.

आयुर्वेदामार्फत नवीन वर्षात एक पाऊल आरोग्याचे आणि भेसळमुक्त अभियानाकडे नक्की उचला असा संदेश या प्रदर्शनातून देण्यात आला. नागरिकांनी प्रदर्शनास भेट देऊन प्रतिसाद दिला.

## दिनदर्शिका प्रकाशन



**उरण : येथील स्वामी विवेकानंद ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा पतसंस्थेचे सेक्रेटरी कौशिक शाह, चेअरमन तथा माजी नगरसेवक नवीन राजपाल, नंदू लांबे आदी उपस्थित होते.**

## आंब्याची पहिली पेटी वाशी बाजारात

**नवी मुंबई :** यंदाच्या हंगामातील केशर आंब्यांची पहिली पेटी रविवारी (दि. ५) वाशी येथील बाजार समितीत दाखल झाली.

देवगड तालुक्यातील वाघोटण येथील आंबा उत्पादक शेतकरी शकील मुल्ला यांच्या बागेत तयार झालेले हे केशर आंबे आहेत. कोकणातून आलेले यंदाच्या हंगामातील हे पहिलेच आंब्याचे फळ असून मुख्य हंगाम १५ मार्चनंतरच सुरू होईल, असे फळ व्यापारी संजय पानसरे यांनी सांगितले.



# डॉ. शिवाजीराव कदम यांना ‘इस्माईलसाहेब मुल्ला जीवन गौरव’



सातारा : प्रतिनिधी

महाराष्ट्र हे देशातील एकमेव असे राज्य आहे की ज्या राज्यात सर्वात जास्त अनुदानित महाविद्यालये आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे, पंजाबराव देशमुख या महापुरुषांची दूरदृष्टी व शैक्षणिक चळवळीमुळे हे शक्य झाले. बहुजन समाजाला पुढे घेऊन जाण्याचे काम या समाजसुधारकांनी केले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पावनभूमीत आजही ही शैक्षणिक चळवळ चिरंतन सुरू आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची अंमलबजावणी सुरू झाली असून कौशल्याच्या जोरावर भारत जगात सर्वात ह्युमन रिसोर्स देणारा देश ठरणार आहे, असे मत राज्याचे उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनी व्यक्त केले.

पै. इस्माईलसाहेब मुल्ला यांच्या ५१व्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या वतीने दिला जाणारा यंदाचा इस्माईलसाहेब मुल्ला जीवनगौरव पुरस्कार या वर्षी भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांना शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्या वेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

## मान्यवरांची उपस्थिती

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या अध्यतेखाली झालेल्या या कार्यक्रमास व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, ॲड. दिलावर मुल्ला, ॲड. रवींद्र पवार, जे.के. जाधव, सचिव विकास देशमुख, सहसंचालक बच्छाव, सहसचिव शिवलिंग मेनकुदळे, बंडू पवार, डॉ. राजेंद्र मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात सतत नवीन काही घडते हे सांगून राज्याचे उच्च शिक्षण संचालक देवळाणकर म्हणाले की भारत देशामध्ये महाराष्ट्र एकमेव राज्य असे आहे की त्या राज्याने नॅक मूल्यांकन अनिवार्य केले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान हे स्वतः मान्य करतात की मी महाराष्ट्रात आल्यानंतर नवीन काहीतरी घेऊन जात असतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याची अंमलबजावणीदेखील आपल्या राज्यात लागू झाली आहे. प्रथम सत्राची परीक्षासुद्धा नवीन पद्धतीने घेतली जात आहे.

आज ज्यांना इस्माईलसाहेब मुल्ला पुरस्कार दिला जात आहे ते कदमसाहेब आणि मी अनेक कमिटीमध्ये एकत्रित काम केले आहे. त्या वेळी कदमसाहेब अध्यक्ष व मी सदस्य असायचो. सदस्याच्या हस्ते अध्यक्षांचा सत्कार होतोय हा माझ्यासाठी भाग्याचा क्षण आहे, अशी कृतज्ञता व्यक्त करीत उच्च शिक्षण संचालक देवळाणकर यांनी डॉ. शिवाजीराव कदम यांचा गौरव केला.

सत्काराला उत्तर देताना भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले की, इस्माईलसाहेब मुल्ला यांनी शिक्षण क्षेत्रात समर्पण करून आणि निष्ठेने काम केले. त्यांच्या नावाचा पुरस्कार मला मिळाला ही अतिशय अभिमानाची व समाधानाची घटना आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कमवा आणि शिका या योजनेतून मी माझे शिक्षण पूर्ण केले. त्यामुळे माझ्या कुटुंबानेच माझा मोठा सत्कार केला आहे.

अध्यक्षीय मनोगतात चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी, इस्माईलसाहेब मुल्ला, रामभाऊ नलवडे, बा.म. ठोके, बॅ.पी.जी. पाटील यांच्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांना पैलू पाडण्याचे काम कर्मवीर अण्णांनी केल्याचे सांगून इस्माईलसाहेब मुल्ला यांचे जीवन अतिशय खडतर होते. स्वतःचे दुःख पचवून शिक्षणानंतर संस्थेची त्यांनी निस्वार्थ सेवा केली. रयत शिक्षण संस्थेसाठी त्यांचे योगदान खूप मोठे असल्याचे नमूद केले.

इस्माईलसाहेब मुल्ला पुरस्काराच्या रकमेत डॉ. शिवाजीराव कदम यांनी स्वतःचे चार लाख रुपये देऊन एकूण पाच लाख रुपये देणगी रयत शिक्षण संस्थेला देऊ केली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ.एम.ए. शेख संपादित ‘समिधा’ या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन प्रमुख अतिथी व मान्यवरांच्या यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी प्रास्ताविक करून सर्वांचे स्वागत केले. डॉ. शिवाजीराव कदम यांना देण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी केले.

# माथेरानमध्ये पर्यटक वाहनचालकाचा धुमाकूळ

## घोड्यासह चार वाहनांना धडक देऊन फरार

माथेरान : बातमीदार

माथेरानमध्ये आलेल्या एका माथेफिरू वाहन चालकाने घोड्यासह चार वाहनांना आपल्या वाहनाने धडक देत स्वतः घाटात अपघातग्रस्त झाला. यावेळी घटनास्थळाहून फरार झालेल्या वाहन चालकास स्थानिकांनीच रात्री उशिरा पकडून माथेरान पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.



शनिवार ( दि. ४) जानेवारी रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास किया कंपनीची कार चालक हा माथेरान वाहन पार्किंग मधून नेरळच्या दिशेने जाण्यासाठी म्हणून एकटाच निघाला होता. यावेळी कार चालकाने वाहन पार्किंगमध्ये उभ्या असणाऱ्या घोड्याला व पार्क केलेल्या पर्यटकांच्या वाहनाला ठोकर दिल्याने चार वाहनांचे मोठे नुकसान केले.

त्यानंतर नेरळ दिशेने निघाला असता चालकाने चांग भले घाट उतरून गारबट दिशेने जातांना कार रस्त्यात रेलिंगला घासल्याने वाहनाचा दर्शनी भाग पूर्णतः नादुरुस्त झाला टायर फुटून मॅकव्हील फुटले होते.तर वाहन ९० अंशाच्या कोनात पुन्हा माथेरान दिशेने गोल फिरले होते.

या भीषण अपघातात बचावलेल्या वाहन चालक आपले वाहन घाटात सोडून घटनास्थळावरून फरार झाला होता.माथेरान व नेरळ पोलीस पोलीस ठाणे हद्दीत घडल्याने नेरळ व माथेरान पोलीस आणि वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी पाहणीसाठी दाखल झाले होते.

पार्किंग व्यवस्थेतील पर्यटकांच्या वाहनाची सुरक्षा ही वनविभागाकडे असल्याने पर्यटकांच्या वाहनांचे नुकसान केल्या प्रकरणी वन विभागाचे अधिकारी व पोलीस रात्री उशिरा पर्यंत पळून गेलेल्या वाहन चालकाचा शोध घेत होते.रात्री उशिरा पळून गेलेला चालक माथेरान रस्त्यावर स्थानिक नागरिकांना दिसून आल्याने त्याला पकडुन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते.

पोलिसांच्या तपासात चालकाचे नाव मोहनेश शीतुरकर वय वर्ष २३ समोर आले आहे तो माथेरानला विकेंड सुट्टीची मज्ञा घेण्यासाठी आलेले मुलुंड येथील सेवानिवृत्त अधिकारी सुनील डोईफोडे यांना माथेरान मध्ये सोडून परतीच्या प्रवासादरम्यान त्याने दारूच्या नशेत हा सर्व प्रकार केल्याचे पोलिसांच्या समोर आले आहे.

# कालव्याच्या पाण्यासाठी बळीराजा फाउंडेशन आक्रमक

धाटाव : प्रतिनिधी

कालवा दुरुस्तीची अनेक कामे निकृष्ट झाल्यने व लांढरजवळील कालव्याचा बांध फुटल्याने निवीपर्यंतच्या कालव्याला अद्याप पाणी नाही. उर्वरित दुरुस्ती कामे तातडीने पूर्ण करून कालव्याला पाणी सोडण्यासाठी बळीराजा फाउंडेशन पाठपुरावा करीत आहे. याबाबत खासदार सुनील तटकरे यांचीही भेट घेऊ, असे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी सांगितले.

दरम्यान, आंबेवाडी ते निवी कालव्याची दुरुस्ती न झाल्याने पाणी सोडता येणार नाही म्हणून तातडीने दुरुस्ती, साफसफाई करण्यात यावी याबाबत कार्यकारी अभियंता मिलिंद पवार यांना विचारणा केली असता कामे लवकर मार्गी लावू, दुरुस्ती कामाची रीतसर पाहणी सोमवारी केली जाईल, असे त्यांनी सांगितले.



# पाताळगंगा औद्योगिक वसाहतीतील फार्मा कंपनीला लागली आग

खालापूर ,चौक,
मोहपाडा : प्रतिनिधी

रसायनी येथील पाताळगंगा औद्योगिक वसाहतीत असणाऱ्या एसपिआर या कारखान्याच्या प्रॉडक्ट्स खात्याला आग लागली. आगीने उग्र स्वरूप धारण केले असून तहसील कार्यालयातील अधिकारी पोलीस व खोपोली कर्जत पनवेल येथील अग्निशमन दलाच्या पथकासह औद्योगिक वसाहतीमधील ६ अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाले असून आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी जिकीरीचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र आगीने तांडव मांडले असुन आग आटोक्यात



आणण्यात काही तास अग्निशमन दलाच्या जवानांना झुंजावे लागणार आहे.

या कंपनीमध्ये आग मोठी असल्याने त्या ठिकाणी अजूनही फायर ब्रिगेडच्या टीमची आवश्यकता असुन परीसरातील सर्वच अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण करण्यात आले आहे. फार्मा कंपनी कैरेमधील कंपनीला आग लागलेली असून आग विझवण्याचे काम सुरू आहे.

कंपनी कॉस्मेटिक प्रॉडक्ट्स व औषधी कंपनीचे मटेरियल बनविण्याचे काम सुरू आहे. पाताळगंगा औद्योगिक वसाहतीमधील रिलायन्स कंपनी मार्गावरील सिप्ला कंपनीसमोर आग असल्याने सिप्ला केमिकल कंपनीलाही आगीचा धोका निर्माण झाला आहे.

खोपोलीमधून फोमची गाडी घटनास्थळी दाखल झाली आहे. कंपनीच्या आवारात असलेले केमिकलने भरलेले ड्रम बाजूला घेण्यात येत आहेत. ही घटना रविवारी दुपारी २ वाजता सुमारास घडली असून आग विझविण्याचे काम सुरू आहे.

# मुरूडच्या पद्मदुर्गवर अवतरली शिवशाही; जागर उत्साहात

मुरूड : प्रतिनिधी

मुरूड येथे समुद्रात असलेल्या पद्मदुर्गमध्ये स्थानिक पद्मदुर्ग जागर संवर्धन समिती व महाडचे कोकण कडा मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मदुर्ग जागर सोहळा रविवारी (दि. ५) मोठ्या उत्साहात झाला. यानिमित्ताने या ठिकाणी शिवशाही अवतरल्याचे दिसून आले.



छत्रपती शिवाजी महाराजांनी जंजिरा किल्ल्यावर नजर ठेवण्यासाठी अरबी समुद्रात ऐतिहासिक पद्मदुर्ग किल्ला बांधला होता. या किल्ल्यावर पावसाळ्यानंतर मोठ्या प्रमाणावर गवत वाढून अस्वच्छता पसरलेली असते. किल्ला स्वच्छ राहावा व किल्ल्याची पडझड होऊ नये याकरिता पद्मदुर्ग जागर संवर्धन समिती व कोकण कडा मित्र मंडळ यांनी १५ वर्षांपूर्वी जागर कार्यक्रम सुरू केला. तो दरवर्षी होतो.

पद्मदुर्गावर सकाळी शिवप्रेमी शेखरमामा फरमान यांच्या हस्ते गड पूजन करण्यात आले. शिवप्रतिमेचे पूजन राजपुरोहित प्रकाशस्वामी जंगम यांच्या मंत्रउच्चारात केले गेले. शिव आरती करण्यात आली. सोबतच किल्ल्यात कोटेश्वरी देवीचे मूळ स्थान आहे, तिथे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमास शिवप्रेमी कोकण कडा मंडळाचे अध्यक्ष सुरेश पवार, पद्मदुर्ग जागर संवर्धन समितीचे अध्यक्ष अशील ठाकूर, संकेत वडके, रोहित पवार, प्रमोद राऊळ (बंदर निरीक्षक), अमर गुरव, प्रमोद भायदे, विजय वाणी, विजय सुर्वे, ज्ञानेश्वर काकडे, महेश मोरे, राहुल कासार, रूपेश जामकर, गणेश सतविडकर, संकेत आरकशी, मंगेश रणदिवे, सतेज विरकुड, वीरेंद्र गायकर, विजय वाणी, अच्युत चव्हाण, प्रदीप बागडे, संदीप घरत, सुनील शेळके, रूपेश दांडेकर, संकेत आरकशी आदी शिवप्रेमी उपस्थित होते.

छत्रपती शिवरायांची प्रतिमा पूजन झाल्यावर ती सजवलेल्या पालखीत विराजमान करून वाजत गाजत पालखी गडाच्या बुरुजावरून फिरवण्यात आली. नंतर कोटेश्वरीचे मूळ स्थान असलेल्या देवीच्या देवळात पालखी दर्शनाला नेण्यात आली. सर्व शिवप्रेमींनी शिवगर्जना करत ढोल ताशाच्या गजरात देवीचा उदो उदो केला. नंतर रेवदंड्याच्या चवरकर बंधूंनी व मंडळींनी तलवारबाजी, भालाफेक असे शौर्याचे खेळ करीत शिवशाहीची आठवण उपस्थितांना करून दिली. त्यामुळे शिवराज्यात गेल्याचा अनुभव आला. शेवटी शिवप्रेमींना महाप्रसाद देण्यात आला.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते साताऱ्यात कवितासंग्रहाचे प्रकाशन

संवेदनशील कवी माणूस आपल्या प्रतिभेने व्यक्तिगत जीवनात व समाजात घडणाऱ्या घटना सुंदर शब्दात कसा टिपतो हे त्यांच्या कविता वाचून दिसून येईल. आजच्या युगातील भावनिक कविता असणारा ‘प्रतिक’ कवितासंग्रह तरुणांना तसेच ज्येष्ठांना वाचण्यासारखा व अनुभवण्यासारखा असून हा कवितासंग्रह लोकप्रिय होईल अशा शुभेच्छा मी देतो.

कवी शशिकांत बडेकर कविता संग्रहनिर्मिती संदर्भात बोलताना सांगितले की, मी कवितासंग्रह छापण्याची कल्पना लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांच्याकडे मांडली, तेव्हा त्यांनी मला सर्वतोपरी सहकार्य केले आणि त्यातूनच माझा कवितासंग्रह पूर्णत्वास आला. मामाचे ललित साहित्य जवळून पाहिले आणि त्याच प्रेरणेतून पुढे लिहित राहिलो. हा प्रवास जवळजवळ ५० वर्षे चालू होता. माझ्या जीवनात आलेल्या अनेक दुःखातून माझ्या कविता उत्कट रूपात व्यक्त झाल्या. माझा मुलगा प्रतीकच्या जाण्याने माझ्या मनाची खूप होरपळ झाली. व्यक्तिगत आयुष्यात दुःख भरून राहिले. प्रकाशनासाठी साहित्यवेल प्रकाशन तसेच मुद्रक कृष्णा चिंचकर व मुद्रितशोधनास डॉ. संजयकुमार सरगडे यांनी सहकार्य केले. कवितासंग्रह निर्मितीसाठी छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागाचे मार्गदर्शन व पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी यांचेही बहुमोल सहकार्य मला मिळाले आहे.

या छोटेखानी कार्यक्रमास अमृत माने, गणेश बडेकर, अनिकेत भिसे, हर्ष सायनाकर, पत्रकार प्रकाश वायदंडे, शुभम जाधव, निखील खरात, बाबू बडेकर, संदीप बडेकर, राज बडेकर, शिरीष जंगम इत्यादी हितचिंतकही उपस्थित होते.

# श्रीवर्धनमध्ये मोकाट श्वानांचा वाढता उपद्रव; नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण

श्रीवर्धन : बातमीदार

श्रीवर्धन तालुक्यात मोकाट श्वानांचा वाढता उपद्रव नागरिकांसाठी चिंतेची बाब बनला आहे. रस्त्यावर बसलेले श्वानांचे टोळके, दुचाकी किंवा चारचाकी वाहनांच्या मागे धावून त्यावर भुंकणे, ही परिस्थिती रोजचीच बनली आहे. यापेक्षा अधिक गंभीर बाब म्हणजे रस्त्यावरून चालत असलेल्या व्यक्तीवर श्वानांनी उडी मारून हल्ला करणे, ज्यामुळे नागरिकांमध्ये भय आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

नगरपरिषद आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून श्वानांचे निर्बिजीकरण आणि शस्त्रक्रिया करण्याच्या मोहिमा नियमितपणे राबविल्या जात नाहीत. परिणामी, श्वानांची संख्या दरवर्षी वाढत आहे. श्रीवर्धनच्या प्रत्येक नाका,



चौकात श्वानांचे टोळके ठाण मांडून बसलेले असतात. दुचाकीस्वारांना श्वानांच्या हल्ल्याचा भ्याड अनुभव होत आहे, ज्यामुळे ते वाहनांचा वेग वाढवून स्वतःच्या जीवाची जोखीम घेत आहेत. अशा परिस्थितीत, काही दुचाकीस्वार श्वानांच्या आक्रमणामुळे गंभीर जखमी होऊन बेशुद्ध अवस्थेत रस्त्यावर पडण्याची घडली आहे. मात्र, श्रीवर्धन नगरपरिषदने भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण आणि शस्त्रक्रिया करण्यासाठी जाहीर निविदा प्रसिद्ध केली असली तरी, कुठलीही प्राणी मित्र संघटना अथवा निमल वेल्फेअर एजन्सीने याबाबत सक्रियतेने पुढाकार घेतला नाही, ज्यामुळे स्थानिक नागरिकांना निराशा झाली आहे.

गेल्या वर्षभरात श्वानांच्या चाव्यांमुळे साधारणपणे १६ ते २० नागरिक जखमी झाले आहेत. गेल्या वर्षी

एक महिलेला श्वानाने अनेक ठिकाणी चावा घेतल्याने ती नशिबाने बचावली. याच प्रकारच्या घटनांचा समोर येणारा धोका वाढत आहे. श्रीवर्धन दांडा येथील एक व्यक्ती ॲक्टिवा मोटार सायकलवर जात असताना श्वानाच्या आक्रमणामुळे गंभीर जखमी झाला आहे.

स्थानिक नागरिकांनी आता नगरपरिषद आणि ग्रामपंचायतींना भटक्या श्वानांच्या समस्येवर त्वरित उपाय योजना आखण्याची मागणी केली आहे. श्वानांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया मोहीम लवकरात लवकर राबवावी, अशी जनआंदोलनाची गरज निर्माण झाली आहे.



**पनवेल : लहान मुलांसाठी कोप्रोली येथेफॉस्टर किड्स प्ले स्कूलचे उदघाटन झाले. या वेळी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांचा शाळेचे अध्यक्ष निवृत्ती महाजन व शिक्षिका प्राची गुंजाळ यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून लोगनाथन पिल्ले, पालकवर्ग आदी उपस्थित होते.**

## दुखवटा

### फर्जंद अल्ली रोगे



**रोहे :** मुस्लिम समाजातील कणखर आणि अभ्यासू नेतृत्व,रोहा नगर पालिकेचे माजी उपनगराध्यक्ष तथा रोहा खालचा मोहल्ला मुस्लिम समाज माजी अध्यक्ष फर्जंद अल्ली रोगे यांचे गुरुवारी ( ता.३ ) रोजी मध्यरात्री १ वा. च्या सुमारास राहत्या घरी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. रायगड जिल्हा फलाऐ सदस्य, रोहा नगर पालिकेचे शिक्षण मंडळाचे सभापती पदावर काम केले. त्यांच्या निधनाने मुस्लिम समाजात पोकळी निर्माण झाली आहे.

## निवडक

### ट्रकच्या धडकेत कारचालकाचा मृत्यू

**पनवेल :** सायन-पनवेल महामार्गावर खारघरजवळ पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास बेलापूरकडे जाणाऱ्या कारचा अपघात झाला. यात चालकाचा जागीच मृत्यू झाला. भरधाव ट्रकने धडक दिल्याने हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. गोविंद कन्हैयालाल शर्मा (वय ४०) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### कळंबोलीत मुली बनल्या 'सावित्री'



**कळंबोली :** सु.ए. सो. चे इंग्रजी माध्यम कळंबोली विद्यालयाच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने वकृत्व, विज्ञान प्रदर्शन, चित्रकला, हस्तकला, रांगोळी अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. विद्या संकुल प्रमुख प्राचार्य राजेन्द्र पालवे, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका कल्पना किशोर कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

# दूषित हवेमुळे गुणवत्ता निर्देशांक वधारला

## उरणमध्ये महामंडळाकडे उपाययोजनेची मागणी

**उरण : रामप्रहर वृत्त**

गेल्या सरत्या वर्षात उरणमध्ये सरासरी हवेचा गुणवत्ता निर्देशांक १५० ते २००च्या पातळीवर राहिला आहे. ही मात्रा मानवी शरीरासाठी घातक म्हणून गणली जाते. या हानिकारक दूषित हवेमुळे वर्षभर उरणकरांचा श्वास कोंडला आहे. या स्थितीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

सध्या मुंबई आणि नवी मुंबई या शहरातील वाढत्या प्रदूषणाची दखल येथील स्थानिक प्रशासनाने घेत त्यासाठीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत, मात्र दुसरीकडे या दोन प्रमुख शहराचे उपनगर असलेल्या उरण आणि



परिसरात दिवसेंदिवस हवेची गुणवत्ता खालावू लागली आहे. येथील वाढत्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित आस्थापनांना देण्यात आल्या असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला आहे. असे असले तरी वर्षभर सातत्याने येथील हवेतील धुळीकणात वाढ होऊ लागली आहे. हवेचा वाढता गुणवत्ता निर्देशांक सामान्य पातळीवर आणण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी गेल्या वर्षी उरण-पनवेल राष्ट्रीय महामार्ग आंदोलन करीत उरण सामाजिक संस्थेने केले होते. त्यावेळी काही प्रमाणात तात्पुरती नियोजन झाले होते.

उरण परिसरातील हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने दोन ठिकाणी नोंदणी केली जात असल्याचा ही दावा केला आहे. तसेच येथील धूलिकणात वाढ झाली आहे, मात्र ही हवा घातक नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तर मानवी शरीरासाठी चांगल्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक नियमावली नुसार निर्देशांक मात्रा ही ० ते ५० किंवा १००पर्यंत चांगली मानली जाते, परंतु १०१ ते १५० पर्यंतचा निर्देशांक ही पातळी निरोगी व्यक्तीला ही हानिकारक मानली जात आहे. तर त्यापुढील नोंद ही अति घातक पातळीवर मानली जाते. उरणची हवेची गुणवत्ता ही अनेकदा ३०० पार ही पोहचली आहे. त्यामुळे उरणमधील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

थंडीतील धुके की धुरके सध्या उरणमध्ये दिवसभर ढगाळ आणि धुक्याचे वातावरण पसरले असते. वातावरणातील दिवसभराच्या धुक्यामुळे वातावरणात धुके की धुरके याचा अंदाज येत नाही. धुरक्यात नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायॉक्साईड, कार्बन डायॉक्साईड या घातक वायूंचे प्रमाण अधिकचे असल्याने मानवी शरीरावर याचे परिणाम होण्याची शक्यता वाढत आहे. वाढत्या हवा प्रदूषणापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी मुखपट्टीचा वापर करण्याची सूचना दिली जात आहे.



पनवेल : तालुक्यातील गव्हाण येथील कमळाकर त्रिंबक देशमुख यांच्या पत्नी व भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख व जयवंत देशमुख यांच्या भावजय अरुणा देशमुख यांचे गुरुवारी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या स्मृतींना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आदरांजली वाहिली.



पनवेल : राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी येत्या १० ते १२ जानेवारीदरम्यान आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी शनिवारी नाट्यगृहाची पाहणी करून आढावा घेतला. या वेळी भाजप सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, चिन्मय समेळ, अमोल खेर, महापालिकेचे राजेश डोंगरे, रोहित गवते, दिपेश गायकवाड आदी उपस्थित होते.




पनवेल : भाजपचे गुरुनाथ म्हात्रे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही म्हात्रे यांना शुभेच्छा दिल्या.



उलवे नोड : आमदार महेश बालदी यांनी उन्नती सोसायटीच्या रहिवाशांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी सोसायटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



नवीन पनवेल : फोस्टर किड्स प्ले स्कूल कोप्रोली, माथेरान रोड या ठिकाणी सुरू झाले आहे. यानिमित्त भाजपचे अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. या वेळी स्कूलच्या वतीने स्वागत करण्यात आले. सोबत माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील तसेच रोशन पाटील होते.



पनवेल : श्री साई तीर्थ प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने पनवेल ते श्री क्षेत्र शिर्डी या पदयात्रा पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असून ५ ते १३ जानेवारीदरम्यान ही पदयात्रा होणार आहे. या पालखी सोहळ्याला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी तसेच संदीप भगत, अनिल गोवारी, प्रकाश भगत, किरण भोईर, राकेश भोईर, दीपक भगत, सागर आंग्रे आदी उपस्थित होते.

## पनवेल येथे रक्तदान शिबिर

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : वार्ताहर**

प्रल्हाद राय झुलेलाल ट्रस्ट सिंधी पंचायत ट्रस्ट व आम्ही रक्तदाते पनवेलचे विद्यार्थी वाहक संघटना पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.५) पूज्य सिंधी पंचायत मंदिर पनवेल येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिनाचे उद्घाटन अमित देवानी, ॲड. मनोहर सचदेव, पांडुरंग हुमणे, मुरलीधर ढाके, संगीता साखरे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर व पत्रकार संजय कदम व ॲड. विजय भगत यांनी सदिच्छा भेट दिली.



या रक्तदान शिबिरामध्ये पनवेलचे सुप्रसिद्ध बिल्डर गिरीशजी कासट, किसन रौंधल यांनी रक्तदान केले. या वेळी ॲड. अमोल शंकर साखरे यांनी आपले जीवनातील शंभरावे रक्तदान पूर्ण केले या रक्तदान शिबिराला रक्तदात्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

या वेळी एकूण १२१ रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभाग घेतला तसेच आरोग्य तपासणी शिबिराला पनवेलकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. हे रक्तदान शिबिर यशस्वी व्हावे याकरिता भूषण चोणकर, सचिन भिसे यांनी विशेष परिश्रम घेतले.

दरम्यान, दोन्ही संघटनांकडून विविध समाजोपयी उपक्रम राबविण्यात येतात.

## तीन अनोळखी व्यक्तींची दुचाकीस्वाराला मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

मोटरसायकलला धडक दिल्याने झालेल्या बाचाबाचीदरम्यान कारमधील तीन अनोळखी व्यक्तींनी २७ वर्षीय तरुणाला दमदाटी करून मारहाण केली. या झटापटीत तरुणाची दोन तोळ्याची सोन्याची चेन गहाळ झाली. या प्रकरणी मारहाण करणाऱ्या कारमधील तीन अज्ञातांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाताणपाडा येथील तुषार मुकादम हा अजिवली येथून घरी जाण्यापूर्वी त्याच्या दुचाकीत पेट्रोल भरण्यासाठी पेट्रोल पंपावर गेला होता. या वेळी येथे आलेली एक कार मागे घेत असताना कारचा मागचा भाग तुषार यांच्या दुचाकीला धडकल्याने तो खाली पडला. या वेळी तुषार याने मागे पुढे बघून कार मागे घेता येत नाही का? असे बोलला असता कारमधील तीन व्यक्तींनी माफी मागण्याऐवजी खाली उतरून तुषार याला शिवीगाळ करून मारहाण केली. प्रतिकार करताना त्यांच्यातील एकाने मागून येऊन डोक्यावर टणक वस्तूने फटका मारला, त्यामुळे तुषारला चक्कर येऊन तो बेशुद्ध पडला. नंतर मारहाण करणारे तेथून निघून गेले. तुषारच्या मित्रांना घटनास्थळ गाठत त्याला दवाखान्यात नेले.

यादरम्यान त्याच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोन्याची चेन गहाळ झाल्याचे समोर आले. तिघांविरोधात गुन्हा दाखल झाला असून पोलीस तपास सुरू आहे.

# खारघरमध्ये न्यू इयर कार्निव्हल

## ◆ आमदार प्रशांत ठाकूर, परेश ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

नवीन वर्षाचे औचित्यसाधून खारघरमध्ये न्यू इयर कार्निव्हला हा अनोखा उपक्रम रविवारी रबावण्यात आला. या उपक्रमाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.



नवीन वर्षाचे औचित्यसाधुन पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक नरेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून तसेच लायन्स क्लब ऑन कोपरा खारघर, सीनीयर सिटीझन आणि खारघर योगा संस्थानच्य सहकार्याने आणि अकार ग्रुपच्या माध्यामतून खारघर सेक्टर १० प्लॉट २०२ मधील स्पोर्ट्स मैदानावर न्यू इयर कार्निव्हला राबवण्यात आला.

यामध्ये योगा, झुंबा, कॅरम, मार्बल, लट्टू, टायर स्टीक, लगोरी, टग ऑफ वॉर, चमचा लिंबू, संगीत खुर्ची, क्रिकेट या सारख्या खेळांसह विविध प्रकाच्या खाद्य पदार्थांचे स्टॉल मॅजिक शो आणि नागरिकांसाठी मोफत हेल्थ चेकअप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये अनेकांनी सहभाग घेतला. या कार्निव्हला पनवेलचे



आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणसि दीपक शिंदे, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, महिला मोर्चाच्या खारघर शहर अध्यक्षा साधना पवार, समीर कदम, सत्यपाल चुग, जीवानंद झा, दीपक नरळावर, रमेश रमण, दत्ता ठाकूर, विलास सावंत, नेहा यादव, धनिषा सावंत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अश्याप्रकारवे उपक्रम सातत्याने राबवले जावे यासाठी भाजप आणि पनवेल महापालिकेच्या माध्यमातून सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याची ग्वाही दिली. दरम्यान, यावेळी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश संघटन पर्व निमित्ताने सदस्य नोंदणी अभियान या ठिकाणी राबवण्यात आले.



पनवेल : ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुका पत्रकार विकास मंचचे सल्लागार डॉ. संजय सोनावणे, सरचिटणीस हरेश साठे, खजिनदार संजय कदम, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, सदस्य प्रवीण मोहोकर, दीपक घोसाळकर, तृप्ती पालकर, राजू गाडे, दत्तात्रेय कुलकर्णी यांनी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# आरोपींवर फास आवळला

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी कारवाईला वेग आला आहे. मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांच्यासह त्यांना फरार होण्यासाठी मदत करणारे डॉ. संभाजी वायबसे आणि सिद्धार्थ सोनावणे यांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या. त्यामुळे अटकेतील आरोपींची संख्या वाढलीय.

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची डिसेंबर महिन्यात हत्या करण्यात आली होती. या घटनेचे पडसाद हिवाळी अधिवेशनातही उमटलेले. मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत कुणालाही पाठिशी घातले जाणार नाही, आरोपींवर उचित कारवाई केली जाईल, असे तेव्हाच स्पष्ट केले होते. त्यानुसार या प्रकरणाच्या तपासाला पोलिसांकडून सुरुवात झाली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आला. विशेष तपास पथकही (एसआयटी)स्थापन केले गेले. या प्रकरणात वाल्मिक कराड याचा हात आहे असे बोलले जाते. हा वाल्मिक कराड ३१ डिसेंबरला पोलिसांना शरण आला. न्यायालयाने त्याला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आरोपी विष्णू चाटे, जयराम चाटे, प्रतीक घुले आणि महेश केदार यांना याआधीच अटक करण्यात आली आहे, मात्र या प्रकरणातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे हे फरार होते. गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस त्यांचा शोध घेत होते. यापैकी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांना शनिवारी पुण्यातून अटक करण्यात आली असून कृष्णा आंगळे अद्याप फरार आहे, तर घुले आणि सांगळे यांना पसार होण्यास मदत करणारे केज येथील डॉ. संभाजी वायबसे आणि मस्साजोगचाच रहिवासी सिद्धार्थ सोनावणे यांनाही ताब्यात घेण्यात आले. डॉ. वायबसेने हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी सुदर्शन घुले याला घटनेच्या दिवशी संपर्क केल्याचा व पैसे पुरविल्याची चर्चा आहे. डॉक्टर, त्याची वकील पत्नी आणि आणखी एकाला नांदेड येथून बीडमध्ये आणून चौकशी करण्यात आली. त्यातूनच मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे यांचे लोकेशन समजले. याशिवाय सिद्धार्थ सोनवणे याने हत्येच्या दिवशी सरपंचाचा ठावठिकाणा सांगितल्याचा संशय आहे. त्याला कल्याणमधून ताब्यात घेतले गेले. विशेष म्हणजेच सरपंचाची हत्या झाल्यानंतर सिद्धार्थ गावातच होता तसेच अंत्यविधीलादेखील उपस्थित होता. घुले, सांगळे आणि सोनवणे यांना केज येथील न्यायालयाने १५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अशा प्रकारे सरपंच हत्येप्रकरणी आरोपींचे अटकसत्र सुरू आहे. याबाबत नागपूर येथे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, मोर्चे काढण्याचा सर्वांना अधिकार आहे, परंतु बीड प्रकरणात सरकार आणि पोलीस पूर्ण शक्तीने कारवाई करत आहे. निर्धाराने कारवाई होत आहे. या प्रकरणात काहीही झाले, कुणीही वाचविण्याचा प्रयत्न केला तरी आम्ही आरोपींना वाचवू देणार नाही. जे जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणाच्या अनुषंगाने जे लोक दादागिरी करून हप्ते गोळा करतात त्या सर्वांवर जरब बसविण्याचे आम्ही ठरविले आहे, असे पुन्हा एकदा स्पष्ट केले. लवकरच सर्व आरोपी गजाआड होऊन या हत्या प्रकरणाचा उलगडा होईल असे चित्र आहे. त्यामुळे आता मोर्चे, आंदोलने थांबली पाहिजेत. पोलिसांच्या विविध शाखा व पथके आपले काम करीत आहेत. त्यांना त्याचे काम करू द्यावे, म्हणजे सर्व काही समोर येईल.**

# अखंड हरीनाम सप्ताहामध्ये कर्जतकर मग्न

कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताहांना सुरुवात झाली आहे. तालुक्यातील सेहेचाळीस गावांमध्ये अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या सप्ताहांमध्ये अनेक धार्मिक कार्यक्रम केले जातात. कर्जत शहरापासून ते अगदी तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातही अखंड हरिनाम सप्ताहांचे आयोजन केले जाते. या चार-पाच महिन्यांत कर्जत तालुका भक्ति रसात अक्षरशः डुंबत असतो.

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगावमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आपले होते. त्यानंतर भाऊ केलटकर, हरिभाऊ वैद्य, विश्वासराव शिंदे, नामदेव दगडे, ह. भ. प. हरिभाऊ महाराज राणे, ह. भ. प. मारुती महाराज राणे, वसंत दानवे, सुरेश पिंपरे आदींनी कर्जत तालुका परिसर कर्जतच्या श्री कपालेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरू करण्यात आला. त्यानंतर महिला मंडळाच्या छोटयाशा मैदानात नेण्यात आले. त्याचे स्वरूप इतके वाढले की नंतर ज्ञानेश्वर माऊलींचे सप्त शताब्दी वर्षानिमित्ताचे औचित्य साधून १९९१ सालापासून हा सप्ताह पोलीस मैदानात आयोजन करण्यात येऊ लागले. यावेळी हे सर्व कार्यकर्ते जेष्ठ कीर्तनकार बाबामहाराज सातारकर यांच्याकडे गेले तेथे त्यांनी तुम्ही माळकरी होणार असेल तर मी तुमच्या सप्ताहात दोन दिवस किर्तनासाठी येईन. त्यावेळी विश्वासराव शिंदे, सुरेश पिंपरे त्यांच्या हस्ते तुळशीच्या माळा गळ्यात घातल्या आणि बाबामहाराज सातारकर कर्जतला आले. त्यांनी दोन दिवस कीर्तन सेवा केली. त्यावेळी कर्जत तालुक्यातीलच नव्हे तर रायगड, ठाणे, पुणे जिल्ह्यातून त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी भाविक आले होते.



### खबरबात
विजय मांडे

पंचेचाळीसाव्या वर्षी बाबमहाराज सातारकर यांच्या कन्या ह. भ.प. भगवती महाराज सातारकर आणि नातू ह. भ. प. चिन्मय महाराज सातारकर हे यंदा कीर्तन सेवा देणार आहेत. या सप्ताहाची देणगी रूपाने आर्थिक बाजू सांभाळण्याचे काम चिवडेवाले म्हणून ओळखले जाणारे दत्तात्रेय देशमुख यांच्याकडे होते. सुरुवातीला नामदेव दगडे अध्यक्ष होते. त्यानंतर दामु अण्णा आठवले यांनी १९९० सालापासून अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. २००४ साली शिवाजीराव देशमुख हे अध्यक्ष झाले. त्यांच्या निधनानंतर ह. भ. प. नथुराम हरपुडे हे अध्यक्षपद सांभाळत आहेत. ज्ञानेश्वर तिवाटणे यांनी अनेक वर्षे सचिव पद सांभाळले होते. त्यांचे स्मरण करणे क्रमप्राप्त आहे. संतोष वैद्य, सुरेश पिंपरे, नरेंद्र जोशी, गणेश सोनी, मोहन ओसवाल, साजन ओसवाल, वनिता म्हसे, शिवाजी भासे, शिवलाल गुप्ता, दत्तात्रेय म्हसे, अनिल पाटील, नंदकुमार कदम, संभाजी देशमुख, अमोल देशमुख, मनिषा सुर्वे, अनिल दगडे आदी कर्जतच्या अखंड हरिनाम सप्ताहाची जबाबदारी सांभाळत आहेत. हा सप्ताह नुकताच पार पडला. यंदा निवडणुकीचे वर्ष असल्याने विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी ज्ञानयज्ञ सोहळा समितीच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन यंदाच्या हरी नाम सप्ताहाचा आम्ही सर्व खर्च करतो. असे सांगत होते, परंतु त्यांचे न ऐकता नेहमीप्रमाणे व्यापारी वर्ग तसेच सर्व सामान्यांकडून देणग्या घेऊन हा उपक्रम करण्याचा निर्णय घेतला. कारण निवडणुका झाल्यानंतर पुढील वर्षी पुन्हा देणग्या घेऊनच हा उपक्रम करावा लागेल. यामध्ये सर्व पक्षीय पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी हातभार लावला. कुणा एकाला 'तो' बहुमान देणे टाळले.



ह. भ. प. मारुती महाराज राणे यांनी कर्जत सह अनेक तालुक्यात कीर्तन सेवा व अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. हजारो जणांना व्यसनमुक्त केले. हजारो जणांना माळकरी केले. त्यांची कोंकण दिंडी प्रसिद्ध आहे. त्यांना रायगड मित्र पुरस्कारासह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक वारकरी त्यामध्ये सहभागी होतात. ह. भ. प. बाळासाहेब फणसे महाराज यांनी कर्जत तालुक्यात अखंड हरिनाम सप्ताह सुरू केले. ह. भ. प. वामन महाराज मोधळे, ह. भ. प. मोरेश्वर महाराज पेमारे, ह. भ. प. नथुराम महाराज हरपुडे, ह. भ. प. मारुती महाराज लोभी, ह. भ. प. भरत महाराज देशमुख, ह. भ. प. द्वारकानाथ महाराज देशमुख, ह. भ. प. प्रवीण महाराज फराट, ह. भ. प. हरिश्चंद्र महाराज जाधव, ह. भ. प. योगिनी महाराज थरकुडे आदी कीर्तनकारांनी कर्जतमध्ये कीर्तन रुपी सेवेने समाज प्रबोधनाचे काम केले. ह. भ. प. श्रीराम महाराज पुरोहित, ह. भ. प. दिलीप महाराज राणे हे सुद्धा कीर्तन, प्रवचने करून समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत. या बहुतेक किर्तनकारांना रायगड भूषण पुरस्काराने सन्मानित केले आहे. या सर्व किर्तनकारांना रंभाजी बुवा थोरवे, मनोहर कडू, सुरेश फराट, अनिल फराट हे अजूनही मृदुंगाची साथ देत असतात. तालुक्यात कर्जत, इंजिवली, वेणगाव, तमनाथ आदी अखंड हरिनाम सप्ताह प्रसिद्ध आहेत. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे सुमारे सहा महिने कर्जत तालुका भक्ती रसात डुंबलेला असतो.



## बदलते तंत्रज्ञान

# ...तर कार, बाईकचा टायर चालेल दीर्घकाळ

कार आणि बाईकचा टायर दीर्घकाळ टिकवण्यासाठी कार असो किंवा बाईक टायरची विशेष काळजी घेणे खूप आवश्यक आहे. कार किंवा बाईकचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे टायर. अशा परिस्थितीत टायर मॉनिटरिंग करणे आणि टायरचे आयुष्य वाढवणे खूप महत्त्वाचे आहे.



टायरचे आयुष्य वाढवायचे असेल तर कार किंवा बाईकस्वाराने काही गोष्टींची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. कारच्या टायरची जितकी चांगली काळजी घेतली जाईल तितका कारचा टायर चांगला परफॉर्म करेल. आज आम्ही तुम्हाला अशाच काही टिप्स सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमच्या वाहनाची विशेष काळजी घेऊ शकता.

तुमच्या कारचा टायर किती काळ टिकेल हे तुमच्या टायरच्या हवेच्या दाबावर अवलंबून असते. टायरमध्ये हवा पूर्ण भरली नसेल तर त्यावर जास्त दाब येतो आणि तो लवकर खराब होतो. अशा स्थितीत गाडीचे टायर वेळोवेळी तपासा, जेणेकरून टायर झिजणार नाहीत. तसेच जर तुम्ही तुमच्या टायरमध्ये सामान्य गॅसऐवजी नायट्रोजन गॅस भरला तर टायरचे आयुष्य वाढेल. नायट्रोजन वायू सामान्य वायूपेक्षा खूप चांगला असतो. यामध्ये टायर ओलसर होण्याची शक्यता कमी असते. वाटेत टायर पंक्चर झाल्यास तो दुरुस्त करण्याऐवजी टायर सीलंट वापरा. असे केल्याने हवेचा दाबही कमी होत नाही. तुम्ही लांबच्या प्रवासाला जात असाल तर टायर सीलंट हा नेहमीच चांगला पर्याय आहे.

खराब रस्त्यावर गाडी चालवल्यामुळे गाडीच्या चाकांमध्ये चाकांचे असंतुलन किंवा अलाइनमेंटसारख्या समस्या उद्भवतात, त्यामुळे कारचे टायर लवकर झिजू लागतात आणि कारचे मायलेज कमी होऊ लागते. कार चालवताना प्रत्येक १०,००० किलोमीटर अंतरावर व्हील अलाइनमेंट करणे आवश्यक आहे.वाहन खरेदी केल्यानंतर बरेच लोक टायर वेगळे करून त्यात बदल करून घेतात. अनेकदा असे टायर गाडीच्या मूळ टायरच्या तुलनेत आकाराने लहान किंवा मोठी असतात. असे टायर बसवल्याने वाहनाच्या मायलेज आणि इंजिनवर निश्चितच परिणाम होतो. याशिवाय ते टायरदेखील लवकर खराब होतात, ज्यामुळे तुम्हाला आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. बाईक-कारचे टायर फक्त ४० हजार किलोमीटर टिकतात, त्यानंतर ते बदलावे.

# आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर

बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर हे मराठी भाषेतील आद्य पत्रकार होते. 'दर्पण' हे मराठीतले पहिले वृत्तपत्र त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केले. त्यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजी सिंधुदुर्गमधील पोंभुर्ले याठिकाणी झाला. जांभेकरांनी बालपणी वडिलांकडे घरीच मराठी व संस्कृत भाषांचा अभ्यास केला. १८२५ मध्ये मुंबईस येऊन ते सदाशिव काशीनाथ उर्फ 'बापू छत्रे' आणि बापूशास्त्री शुक्ल यांच्याकडे अनुक्रमे इंग्रजी व संस्कृत शिकू लागले. या दोन विषयांबरोबरच गणित आणि शास्त्र या विषयांत त्यांनी प्रावीण्य मिळविले.

'बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत कोणाही भारतीयाला तोवर न मिळालेली प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळवण्याइतपत ज्ञान कमवले. १८३४ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेजात पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून जांभेकरांची नियुक्ती झाली. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या १० भाषांचे ज्ञान होते. जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांच्यावर शोधनिबंध लिहिले. मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली.गणित व ज्योतिष यांतही ते पारंगत असल्यामुळे त्यांची कुलाबा



### निमित्त

वेधशाळेच्या संचालकपदी नियुक्ती झाली. शिवाय त्यांना रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र याचे उत्तम ज्ञान होते. हे लक्षात घेऊन बाळशास्त्री जांभेकर यांची तत्कालीन सरकारने मुंबई इलाख्याच्या शिक्षण विभागाचे अधिकारी म्हणून नेमणूक केली. या काळामध्ये बाळशास्त्रींनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. शिक्षणाच्या संदर्भामध्ये मोलाची भूमिका बजावली. ६ जानेवारी १८३२ रोजी वयाच्या २० व्या वर्षी 'दर्पण' हे मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले. दर्पण हे वृत्तपत्र इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांतून प्रसिद्ध करण्यात येत असे. या वर्तमानपत्राचा उद्देश हा स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि लोकांना त्या देशांची समृद्धी व येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्र विचार करता व्हावा हा होता. वृत्तपत्राची किंमत १ रुपया होती. इंग्रजी आणि मराठी अशा जोड भाषांत प्रकाशित होणाऱ्या या वृत्तपत्राच्या अंकात दोन स्तंभ असत. उभ्या मजकुरात एक स्तंभ (कॉलम) मराठीत आणि एक इंग्रजीत असे.दर्पण हे सुरुवातीला पाक्षिक आणि नंतर साप्ताहिक होते. दर्पणवर बाळशास्त्री च्या विचारांचा आणि व्यक्तिमत्त्वाचा ठसा होता. २४ ऑगस्ट १८३२ रोजी जांभेकरांनी 'विद्या हे बळ आहे' या शीर्षकाचा लेख लिहिला व त्यातून विद्येचे महत्त्व मानले. १८४० साली 'दिग्दर्शन' हे मराठी भाषेतील पहिले मासिक सुरू केले. 'दर्पण' अशा रीतीने साडे आठ वर्षे चालले आणि जुलै १८४०मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला.'दिग्दर्शन'मधून ते भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थ विज्ञान, निसर्ग विज्ञान, व्याकरण, गणित तसेच भूगोल व इतिहास याविषयांवरील लेख व नकाशे आकृत्यांसह प्रकाशित करत.१८४५ मधे पहिली छापील ज्ञानेश्वरी जांभेकरांनी काढली.

बाळशास्त्री जांभेकर यांनी हिंदू धर्मातून इतर धर्मात भरकटलेल्या लोकांच्या पुनरुत्थान आणि शुद्धीकरणावर दृढ विश्वास ठेवला आणि त्यांच्या पूर्वजांच्या धर्मात परत जाण्याचा सल्ला दिला. जस्टिस ऑफ पीस ही पदवी देऊन गौरविले होते. १७ मे १८४६ रोजी मुंबई येथे अल्पावधीच्या आजारानंतर जांभेकरांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# खास डिझाइन केलेली उशी तुमचे घोरणे कमी करू शकते?

उशी तुमचे घोरणे कमी करू शकते? सतत घोरणे त्रासदायक ठरू शकते, परंतु ते आरोग्य समस्यादेखील सूचित करू शकते. घोरणे टाळण्यासाठी मूळ कारण शोधून त्यावर उपचार करणे गरजेचे आहे. तज्ज्ञ वेज उशीपासून सुरुवात करण्याचा आग्रह करतात, ज्यामुळे तुम्हाला थोडा आराम मिळू शकेल.



विशेषतः वैद्यकीय दृष्टिकोनातून वेज उशी घोरणे रोखण्यासाठी फायदेशीर ठरू शकतात, झोपल्यावर तुम्ही तेव्हाच घोरता, जेव्हा घशाचे स्नायू शिथिल होतात आणि जिभेची स्थिती किंवा झोपेच्या वेळी नाक बंद झाल्यामुळे श्वासनलिकेला अर्धवट अडथळा येतो, तेव्हा घोरणे अनेकदा उद्भवते. वेज कुशन शरीराच्या वरच्या भागाला उंच करते, ज्यामुळे हवेचा प्रवाह सुधारतो आणि हे अडथळे कमी होतात, ही खास डिझाइन केलेली उशी आहे, तजी तुम्ही झोपत असताना तुमच्या शरीराच्या वरच्या भागाला आधार देण्यास मदत करते.

मूळ कल्पना म्हणजे तुमचे शरीर आणि डोके उंच ठेवा आणि तुमच्या वायुमार्गाचे संरेखन सुधारणा करा. हे तुमच्या घशाचे स्नायू आणि हवेचा प्रवाह रोखण्याचा धोका लक्षणीयरीत्या कमी करते, हे घोरण्याचे एक सामान्य कारण आहे, असे परळ येथील ग्लेनेगल हॉस्पिटलचे पल्मोनोलॉजी आणि फुफ्फुस प्रत्यारोपण विभाग संचालक डॉ. समीर गार्डे सांगितले की, प्रत्येकासाठी ही उशी आरामदायी वाटू शकत नाही. कदाचित त्याचा त्यांच्या झोपेच्या वेळेवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

डॉ. हरिचरण यांनी असेही नमूद केले की, वेज कुशन हलके ते मध्यम घोरणे कमी करू शकतात, परंतु ते सर्व आजारांसाठी फायदेशीर नाही. जीवनशैलीतील बदल, जसे की वजन कमी करणे, झोपण्यापूर्वी अल्कोहोल टाळणे अशा काही गोष्टी वेज पिलोच्या वापरास पूरक असाव्या. गंभीर प्रकरणांमध्ये सीपीएपी (कंटिन्युअस पॉझिटिव्ह एअरवे प्रेशर) सारखे वैद्यकीय उपचार आवश्यक असू शकतात. घोरण्यासंबंधित समस्या दूर करण्यासाठी वेज कुशनची परिणामकारकता व्यक्तीपरत्वे बदलू शकते. जर तुम्ही दीर्घकाळ घोरत असाल, तर घरगुती उपाय वापरण्याऐवजी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा असे डॉ. गार्डे म्हणाले.

काही प्रकरणांमध्ये घोरणे विविध अंतर्निहित आरोग्य स्थिती दर्शवू शकते, जसे की लठ्ठपणा किंवा तीव्र अनुनासिक रक्तसंचय. या किरकोळ परंतु गंभीर स्थितीकडे दुर्लक्ष केल्याने आरोग्य कालांतराने खराब होऊ शकते.

# खोपोलीत शिक्षण प्रसारक मंडळात भ्रष्टाचार?

## कडक करवाईची यशवंत साबळे यांची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीसह खालापूर तालुक्यात शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे पुरावे संस्थेचे अर्थ व बांधकाम सभापती यशवंत साबळे यांच्या हाती लागले असून, सदर पुराव्या नुसार त्यांनी खोपोली पोलिसांत तक्रार दाखल केली असून संस्थेचे सेक्रेटरी किशोर पाटील यांनी पदाचा गैरवापर करीत शासकीय मुद्रांकाचा गैरवापर करून खोटी कागदपत्रे बनवून संस्थेला फसवून भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



खोपोली शहरांतील खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळात काही तरी गोंधळ झाला आहे अश्या चर्चा मागील काही दिवस प्रसार माध्यमांवर ऐकावयास मिळत होत्या पण, आता या शिक्षण संस्थेत भ्रष्टाचार झाला असल्याचे प्रकरण स्वतः संस्थेचे अर्थ व बांधकाम सभापती यशवंत साबळे यांनी लोकांसमोर आणल्याने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचे पडसाद आगामी खोपोलीच्या सामाजिक व शैक्षणिक घडामोडीवर पडणार असल्याचे चर्चा आहे.

संस्थेचे सेक्रेटरी किशोर पाटील हे संस्थेत असलेल्या जनता विद्यालय खोपोली या इमारती मध्ये शैक्षणिक उपयोगी वस्तू करता विद्यार्थी सहकारी ग्राहक भंडार चालविण्यास घेतले व सहकारी ग्राहक भांडारामध्ये काही अनियमितता असल्याचा संशय यशवंत साबळे यांना आला तसे त्यांनी संस्थेकडून याबाबत कागदोपत्री माहिती मागावली व ती तपासली तेव्हा १५ जुन २००८ साली करारनामा करारनामा करताना त्याला जोडलेला नॉन ज्यूडिशियल स्टॅम्प पेपर २२ ऑक्टोंबर २००८ रोजी खरेदी केलेला आहे. सेक्रेटरी किशोर पाटील चार महिन्यानंतर खरेदी केलेला स्टॅम्प पेपर करारनांम्याला कसा वापरू शकतात याचा अर्थ किशोर पाटील यांनी खोटी कागदापत्रे वापरून संस्थेची व लोकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करून भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप यशवंत साबळे यांनी केला असून या प्रकरणाची फौजदारी गुन्हा दाखल करून लवकरात लवकर सखोल चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

यशवंत साबळे यांनी केलेल्या आरोपाबाबत संस्थेमध्ये सर्व काही अलबेल आहे असे नाही अशी चर्चा सध्या खोपोली शहरात जोरदार सुरू आहे. प्रसार माध्यमांवर दररोज होणाऱ्या आरोपाबाबत संस्थेचे वरिष्ठ पदाधिकारी मात्र मौन बाळगून आहेत त्यामुळे संस्थेत नक्की चालले तरी काय? याबाबत उलट सुलट चर्चा आहे. तक्रारीचा चेंडू पोलीस ठाण्यात गेल्यामुळे पोलिसांची काय भूमिका आहे, याकडे खोपोलीकरांचे लक्ष लागले आहे, या संदर्भात पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्याशी संपर्क साधला असता आमच्याकडे अर्ज आला आहे त्याची चौकशी आम्ही करीत आहोत. असे उत्तर देण्यात आले

# शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत खालापूर मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत युवासेना तालुका प्रमुख अमर मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली दहिवली ग्रामपंचायत हद्दीतील बिरदोले गावातील शेतकरी कामगार पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांनी आज शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी माजी सरपंच यशवंत हरिचंद्र कालेकर, बाळाराम महादू कालेकर, वालकू धोंडू कालेकर, अंकुश धोंडू कालेकर, प्रकाश हरिचंद्र कालेकर, लहू सखाराम कालेकर, भानुदास लक्ष्मण कालेकर, वासुदेव नामदेव जामघरे, पंकज वासुदेव जामघरे, मंगेश रामचंद्र बागडे यांनी शिवसेना पक्षाचा प्रवेश केला. या सोहळ्या प्रसंगी जिल्हा प्रमुख संतोष भोईर, तालुका प्रमुख सुदाम पवाळी, युवा सेना तालुका प्रमुख अमर मिसाळ, जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुरेश टोकरे , जिल्हा संघटक संभाजी जगताप, माजी उपसभापती मनोहर थोरवे, महिला जिल्हा प्रमुख सुप्रिया साळुंखे तसेच शिवसेना पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# माणगावात वीर भाई कोतवाल पुण्यतिथी साजरी

**माणगाव : बातमीदार**

माणगाव शहर संघटना यांच्या वतीने हुतात्मा वीर भाई कोतवाल पुण्यतिथी जल्लोषात साजरी करण्यात आली.

संदीप शिंदे व चंद्रकांत यादव गुरुजी यांनी वीरभाई कोतवालांच्या फोटोला पुष्पहार अर्पण केले तर दीपप्रज्वलन सिताराम भोसले, किरण जाधव, सचिन जाधव, आखिल चव्हाण, अनंत हुजरे यांनी केले.

यावेळी वीरभाई कोतवाल शहर सलून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष जयंत शिंदे, अध्यक्ष आखिल चव्हाण, उपाध्यक्ष कृष्णा साळुंखे, कार्याध्यक्ष शहानु शहा, गोपाल सैन, मदन सैन, सुभाष खराडे, कृष्णा कदम, नागेश भोसले, बबन कडव, दीपक यादव, संतोष दिवेकर, वकील शहा, अक्रम कासार, नंदू सुतार, बजरंग सैन, निलेश भोसले, मोहन जाधव, अब्बास शहा, प्रेम खराडे आदी उपस्थित होते.



संघटनेचे माजी अध्यक्ष राहुल कडव यांनी कार्यक्रमाचे नियोजन व खर्च केले. संदीप शिंदे गुरुजी यांनी वीरभाई कोतवाल यांच्या संदर्भात मनोगत व्यक्त केले तर चंद्रकांत गुरुजी यांनी सदस्यांचे आभार मानले.

# रोह्यात भाजप सदस्य अभियान सुरू

## पदाधिकारी व कार्यकर्त्यांना खासदार धैर्यशील पाटील यांचे मार्गदर्शन



**धाटाव : प्रतिनिधी**

भाजपा प्रदेशाध्यक्ष व वरीष्ठ नेते यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीतील आर.आय . आर . सी . येथे रविवार (दि. ५ ) रोजी भाजपा सदस्य अभियान नोंदणी करण्यासाठी कार्यकर्ते व पदाधिकारी यांना मागदर्शन करण्यात आले या अनुषंगाने बैठक घेण्यात आली.

या बैठकीत मार्गदर्शन करताना भाजपाचे खासदार धैर्यशील पाटील यांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सांगितले की, पक्षश्रेष्ठींनी दिलेल्या आदेशानुसार जगातील सर्वात मोठ्या पक्षाची नोंदणी सुरू आहे . भाजपा पक्ष शीर्षक नेतृत्व व भाजपा तळागाळातील कार्यकर्ते झपाटल्यासारखे पक्ष नोंदणी करित आहे . मतदार व जनमाणसाने जी विचारसरणी स्वीकारली आहे . या नोंदणीला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद देत असल्यामुळे याचा आम्हाला अभिमान आहे. तसेच हे अभियान येत्या पंधरा जानेवारी पर्यंत भाजपा सदस्य नोंदणी अभियान सुरू असणार आहे असे खासदार धैर्यशील पाटील म्हणाले .

देशाचे कुशल नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी , महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे त्यांचा आदेशानुसार भाजपा सदस्य नोंदणी अभियान सुरू झालेला आहे . सबका साथ , सबका विकास, सबका प्रयास त्या माध्यमातून प्रत्येक कार्यकर्त्यांनी भाजपा सदस्य नोंदणी सुरू करायचे आहे असे आवाहन भाजपा सदस्य नोंदणी दक्षिण रायगड जिल्हा प्रभारी तथा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील त्याने दिले. तसेच या सदस्य नोंदणी मुळे तळागाळातील जनतेला मुख्य प्रवाहात आणून विकासाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये आणायचे आहे हे उद्दिष्ट भाजपचे आहे असे वैकुंठ पाटील म्हणाले.




या वेळी तालुका अध्यक्ष अमित घाग, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, आनंद लाड, एकनाथ ठाकूर, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, रोहा शहर अध्यक्ष यज्ञेश भांड, रोहा तालुका युवा मोर्चा अध्यक्ष महेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस महिला मोर्चा जयश्री भांड, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अर्पणा सुटे , राजेश डाके , युवा वॉरियर्स जिल्हा संयोजक वैभल कुलकर्णी, जेष्ठ नेते वसंत शेलार, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस रिया कासार, महिला मोर्चा जिल्हा सदस्य दिपाली कासार, अदिती शिंदे यासह भाजपा सदस्य व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# राज्य आंतरविद्यापीठ आविष्कार स्पर्धा लोणेरेला

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात तयारी सुरू

**माणगाव : बातमीदार , प्रतिनिधी**

महामहीम राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती यांचे कार्यालयामार्फत महाराष्ट्र राज्य आंतर-विद्यापीठ आविष्कार स्पर्धा २०२५ चे आयोजन डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, रायगड येथे दिनांक १२ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान करण्यात येणार आहे. अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली.



आविष्कार ही राज्यव्यापी आंतर विद्यापीठ संशोधनावर आधारित स्पर्धा असून या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील एकूण २६ विद्यापीठांचा समावेश आहे. या कार्यक्रमासाठी एकूण १००० पेक्षा अधिक नवकल्पक विद्यार्थी व २०० पेक्षा अधिक विद्यापीठ प्रशिक्षक सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा सहा वेगवेगळया श्रेणींमध्ये आयोजित केली जाणार आहे.

मानवता भाषा आणि ललितकथा, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, शुद्ध विज्ञान, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, औषधे आणि फार्मसी, कृषी आणि पशुसंवर्धन आविष्कार या स्पर्धेसाठी राज्यपाल कार्यालय राजभवन यांनी नियुक्त केलल्या निरीक्षण समितीच्या मार्गदर्शनाखाली दहा निरीक्षक निवडलेले असतात तसेच राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञ, संशोधक व इतर मान्यवर यांचा परीक्षक म्हणून सहभाग असतो. विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल प्राध्यापक डॉ. कारभारी काळे, यांच्या मार्गदर्शनानुसार व निर्देशानुसार आविष्कार या स्पर्धेची यशस्वी आयोजनाची तयारी सुरु आहे. आविष्कार ही स्पर्धा राजभवन कार्यालयातून २००६-०७ शैक्षणिक वर्षापासून सुरू झाली असून, या स्पर्धेचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोपासना करणे, तसेच विद्यार्थ्यांना संशोधनासाठी प्राथमिक संधी उपलब्ध करून देणे त्याचबरोबर त्यांच्यामध्ये स्पर्धात्मकता निर्माण करणे हे आहेत.


### निवीदा सुचना

**संकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत.**
(REG.NO. NBOM/HSG (OH)/420/JTR/1996-97)
**पत्ता : प्लॉट नं बी-३, सेक्टर-६, नवीन पनवेल. जिल्हा-रायगड ४१०२०६.**

या इमारतीच्या पुनर्विकासाची प्रक्रीया करावयाची आहे. ही प्रक्रीया सुलभ करण्यासाठी, या कामी सोसायटीला मदत करण्यासाठी, आम्ही प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांचे प्रस्ताव आमंत्रीत करीत आहोत. इच्छुक प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे अर्ज सोसायटी कार्यालयात कोणत्याही दीवशी पाठवू शकता कींवा सोडू शकतात. ही सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसात अर्ज प्राप्त होणे आवश्यक आहे. ५ दिवसा नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कोणतेही कारण न देता, कोणतीही ऑफर प्रस्ताव नकारण्याचा अधीकार सोसायटीने राखून ठेवलेला आहे
**संपर्क : ९६६५८८८५९९/९००४६५२१५०/९३२२०८०९११**

**दिनांक : ०५/०१/२०२५**

**सही/- कोषाध्यक्ष** | **सही/- सचिव** | **सही/- अध्यक्ष**

**संकल्प सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**


# श्रीवर्धन तालुक्यातील बीएसएनएल भ्रमणध्वनी सेवा ठप्प



**श्रीवर्धन : बातमीदार**

तालुक्यातील आपत्कालीन परिस्थितीत भारतीय संचार निगम मर्यादित (बीएसएनएल) कंपनीची भ्रमणध्वनी सेवा वारंवार नॉट रिचेबल होत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागले आहे. सेवेत असलेला खंडामुळे अनेक ग्राहकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. ग्राहक तक्रार नोंदवण्यासाठी कार्यालय गाठतात, परंतु ते बंद असल्यामुळे ग्राहकांमध्ये कंपनीविषयी नकारात्मक भावना पसरत आहेत.

बीएसएनएल कंपनीने काही वर्षांपूर्वी श्रीवर्धन सह अनेक लहान आणि मोठ्या खेडेगावांमध्ये टॉवर्स उभारले होते. तेव्हा खाजगी कंपन्यांच्या तुलनेत बीएसएनएलचे दर कमी आणि सेवा चांगली असल्यामुळे त्यावेळेस बी.एस. एन.एल.चा वापर अधिक प्रमाणात होत होता. मात्र, काही वर्षांपूर्वी झालेल्या नैसर्गिक आपत्तीत तालुक्यातील भ्रमणध्वनी टॉवर्स मोठ्या प्रमाणावर नादुरुस्त झाले. खाजगी कंपन्यांनी त्याच ठिकाणी नवीन टॉवर्स उभारले, परंतु बीएसएनएल अद्यापही आपल्या सेवेत बदल करण्यास तयार नाही.

तालुक्यातील नागरिकांनी भयानक नैसर्गिक आपत्तीला तोंड दिले. या आपत्तीमध्ये भ्रमणध्वनी सेवा खंडित झाल्यामुळे शासकीय यंत्रणा आणि नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. शासकीय पातळीवर हे स्पष्ट करण्यात आले आहे की, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधल्यास तात्काळ मदत मिळवता येईल.

या सर्व प्रक्रियेचा भाग असलेल्या भ्रमणध्वनी सेवेला अखंडित सुरू ठेवण्याची जबाबदारी शासनाची आहे.यासाठी जिल्हा आपत्ती निवारण यंत्रणेने बी.एस.एन.एल. कंपनीला आपल्या टॉवर्स आणि नेटवर्कमध्ये सुधारणा करणे आणि सेवा अखंडित ठेवण्याचे निर्देश देणे आवश्यक आहे. बीएसएनएल कंपनीने आपल्यातल्या सध्याच्या तांत्रिक समस्यांचे निराकरण करून, ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली पाहिजे. विद्यमान टॉवर्स जुन्या पद्धतीचे असून त्यात केबल्स बदललेले नाहीत. यामुळे अनेक ठिकाणी सेवा खंडित होते.

मनुष्यबळाचा अपुरेपणाही समस्येचे मुख्य कारण आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी, आपत्तीच्या काळात संवाद साधणे महत्त्वाचे आहे. शासकीय यंत्रणांकडून या बाबतीत तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक आहे. बीएसएनएलला आदेश देऊन सेवा सुधारणे आणि अखंडित ठेवण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर आहे. संपूर्ण स्थितीवर वरिष्ठांनी तत्काळ दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

पनवेल आणि उरण तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांकरिता विद्यावेतनाचे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **३० नोव्हेंबर २०२४** पर्यंत होती. तथापि सिडको प्रशासनाने विद्यावेतन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत **दि. ३१ जानेवारी २०२५** पर्यंत वाढविली असुन अद्याप अर्ज सादर न केलेल्या प्रकल्पग्रस्त विद्यार्थ्यांनी विद्यावेतनाचे अर्ज **दि. ३१ जानेवारी २०२५** पर्यंत **पुनर्वसन विभाग, सिडको लि., ७ वा मजला, टॉवर नं ७, बेलापूर रेल्वे स्टेशन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई** येथे सादर करावेत. दि. ३१ जानेवारी २०२५ नंतर आलेले विद्यावेतनाचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**महाव्यवस्थापक (पुनर्वसन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३८२/२०२४-२५

## निवडक



### अभिजित सांगळे यांना पुरस्कार

**नवी मुंबई :** राजश्री शिवबा विचार पसारक मंडळ, ट्रस्ट नवी मुंबई यांच्या माध्यमातून अभिजित सांगळे यांना रायगड किल्ल्याबरील सदरेवर झालेल्या सोहळ्यात शिवरत्न प्रस्कार देऊन गौरविण्यात आले. सांगळे यांनी कोविड काळात परदेशात गेलेल्या पंधरा हजारांहून अधिक नाविक व विद्यार्थ्यांना इंडोनेशिया, नायझेरिया देशातील नाविक आणि भारतात सुखरूप परत आणण्याची महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. ऑल इंडिया सिफेरस युनियनच्या याकार्याची दखल कंद्रीय मंत्रालय, गृह मंत्रालय आणी विदेश मंत्रालयाने त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली होती. युनियनच्या मदतीने प्रामुख्याने इराण, दुबई, तुकी, मलेशिया, इंडोनेशिया, नायझेरिया देशातील नाविक आणि विद्यार्यांना भारतात परत आणण्याचे काम केले गेले आहे.

### आज रक्तदान, आरोग्य शिबिर

**नवी मुंबई :** ऐरोली येथील माँ वैष्णोदेवी चॅरिटेबल ट्रस्ट, नवी मुंबई व राष्ट्रीय पत्रकार संघ (नियो.) यांच्या वतीने दि.



६ जानेवारी रोजी दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत पत्रकार व नागरिकांसाठी आरोग्य, नेत्र चिकित्सा, व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता पत्रकाराचा प्रमुख अतिथी यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम नेवा रेसिडेन्सी शॉप न. ३/४ यशोदीप हाईट जवळ ऐरोली नवी मुंबई या ठिकाणी होणार आहे. माँ वैष्णोदेवी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष गणेश म्हात्रे यांनी अशी माहिती दिली की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून ते समाजातील बऱ्या वाईट गोष्टीवर आसूड ओढतता. त्यांच्या करिता आमच्याकडे ट्रस्टच्या वतीने पत्रकारांचा सन्मान करण्यात येतो.

# नवी मुंबईत भाजप सदस्यता अभियानास सुरुवात

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

राज्यभरात ५ जानेवारीपासून भाजप प्राथमिक सदस्यता नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. त्याच अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थित नेरूळ विभागापासून सदस्य नोंदणी अभियानास प्रारंभ झाला.

भाजपमध्ये सहा वर्षांतून एकदा संघटन पर्व असते. यात केंद्रापासून तर प्रदेशापर्यंत सर्व ठिकाणी प्राथमिक सदस्यता नोंदणी प्रक्रियेला सुरूवात होते. देशभरात वर्षभर संघटन पर्व



सुरू आहे. राष्ट्राला समर्पित भावनेतून काम करणाऱ्या आणि जगभरात सर्वांत जास्त प्राथमिक सदस्य असलेला एकमेव भाजप पक्ष आहे. या विचारधारे सोबत सर्वांना जोडायचे आहे. संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार प्राथमिक सदस्यता नोंदणी सुरू आहे. १५१ बेलापूर मतदारसंघामध्ये ३० ठिकाणी सदस्य अभियानाची नोंदणी सुरू आहे. तसेच आतापर्यंत ५९३६ सदस्य नोंदणी झाली आहे. २० जानेवारी पर्यंत नोंदणी सुरु राहणार असून सदस्य नोंदणी अभियानाला नागरिकांचा उत्स्फुर्द प्रतिसाद मिळत असल्याचे आमदार म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत भाजपचे पदाधिकारी राजू तिकोने, सामाजिक कार्यकर्त्या उल्का तिकोने, ऋषिकेश भुजबळ, सुजित भोर, सचिन दिघे, अक्षय शिरगावकर, विजय पोटे, अरविंद इंगवले, संतोष बारवे, सुषमा तोरणे, ललिता पाटील, सुरेखा हुंडारे, स्नेहा पाटील, रूपाली जाधव, सुवर्णा थोरात, तेजश्री भोर, सोनाली भोर, स्नेहलता सानप, शैला कुराडे तसेच असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पनवेल मनपा शाळांची सहविचार सभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सर्व शाळांची सहविचार सभा शनिवारी (दि.४) लोकनेते दि.बा पाटील महानगरपालिका शाळा क्रमांक एक या ठिकाणी शिक्षणाधिकारी रमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी पनवेल मनपा सर्व शाळातील मुख्याध्यापक, पदवीधर/विषय शिक्षक व उपशिक्षक सर्वजण उपस्थित होते.

या वेळी इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती, इयत्ता चौथी व सातवीसाठी पनवेल मनपा टॅलेंट सर्च परीक्षा नियोजन, निपुण भारत या अंतर्गत गुणवत्ता विकास कार्यक्रम, आनंदी तसेच दप्तराविना शनिवार, इयत्तानिहाय क्षमता तपासणी बाबत मार्गदर्शन व पुढील तीन महिन्यांमध्ये गुणवत्तावाढी संदर्भात करावयाच्या उपायोजना या संदर्भातले नियोजन यावरती यावेळी चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.

या सहविचार सभेचे वैशिष्ट्य म्हणजे आयुक्त मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागाने सन २०२५ या नववर्षाच्या निमित्ताने ड्रेस कोड सुरू केला आहे.

खासगी शाळांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी मनपा शाळा सज्ज आहेत. दर सोमवार व गुरुवार हा गणवेश परिधान केला जाईल व दर शनिवारी ट्रॅकसूट परिधान करण्यात येणार आहे. या सहविचार सभेवेळी सर्व शिक्षकांनी हा गणवेश परिधान केला होता.

## विश्व आयुर्वेद परिषदेत डॉ. किरण कल्याणकर यांचा शोध निबंध



**पनवेल : वार्ताहर**

डेहराडून येथे १० व्या विश्व आयुर्वेद परिषदेमध्ये खारघर, नवी मुंबई येथील गत पंधरा वर्षे कर्करोगावर आयुर्वेदीय उपचार करणारे डॉ. किरण कल्याणकर यांचा ब्रेन कॅन्सर व आयुर्वेदीय उपचार या शिर्षकाचा एव्हीडेन्स बेस्ड केस सिरीज हा शोध निबंध सादर केला गेला.

डेहराडून येथे १० व्या विश्व आयुर्वेद परिषदेचे आयोजन झाले. देश तथा परदेशातून दहा हजार हुन अधिक डॉक्टर या परिषदेस उपस्थित होते. तीस देशाचे राष्ट्रीय प्रतिनिधी या कार्यक्रमास हजर होते. आधुनिक काळातील नवनवीन आजार, आयुर्वेदात होणारे वेगवेगळे इनोव्हेशन, संशोधन व डिजिटल हेल्थ आदी विषयांवर शोधनिबंध प्रसिद्ध करण्यात आले.

यात दहा हजारांतून मोजक्या निवडल्या गेलेल्या शंभर रिसर्च पेपरमध्ये डॉ. किरण कल्याणकर यांच्या शोध निबंधाचा समावेश झाला आहे.

आयुर्वेदाच्या माध्यमातून मस्तिष्क किंवा मेंदूच्या कर्करोगावर केले गेलेले यशस्वी आयुर्वेदीय उपचारांचा रुग्णाला होणारा सुपरिणाम, कॅन्सर च्या ग्रंथीचा लहान झालेला आकार, रुग्णाची सुधारलेली जीवनशैली आणि वाढणारे आयुष्यमान यावर प्रकाश टाकण्यात आला.

आयुर्वेदिक उपचारांचे कॅन्सर सारख्या आजारातील महत्त्व या संशोधनामुळे सिद्ध झाले असून यांचा कॅन्सर पीडित रुग्णांनी याचा आवर्जून फायदा करून घ्यावा.

## वाशीच्या केबीपी कॉलेजमध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाची सुरुवात १ जानेवारी रोजी सामुहिक वाचनाने करण्यात आली. या उपक्रमाचे उदघाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या हस्ते करण्यात आले.

युवा पिढी वाचनापासून दुरावत असल्यामुळे व युवा पिढीस वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी शासन स्तरावर वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ ते १५ जानेवारीपर्यंत राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाने सुरु केलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे, अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांकडून व्यक्त होत आहे. महाविद्यालयात १ ते १५ जानेवारी या वाचन पंधरवड्यात प्रकट वाचन, काव्यवाचन, अभिवाचन, वाचन सत्र, वाचन संवाद, ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ विक्री, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक परीक्षण व निबंध स्पर्धा असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

उपक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. पहिल्या दिवशी सामुहिक वाचनामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांनी पुस्तके, नियतकालिके, चरित्रे, आत्मचरित्रे व वर्तमानपत्रे इत्यादीचे वाचन केले.आजच्या सामुहिक वाचनामध्ये महाविद्यायातील २५० हून अधिक विद्यार्थी व २५ पेक्षा अधिक प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक यांनी आपला सहभाग नोंदवला.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रंथपाल मानसी रसाळ, ग्रंथालय सेवक व ग्रंथालय समिती सदस्य यांचे सहकार्य लाभले.

## वीर वाजेकर महाविद्यालयाची कोप्रोली आरोग्य केंद्रात क्षेत्रभेट

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथीलवीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या आरोग्य केंद्र समितीने कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली.

या भेटीत ग्रामीण आरोग्य केंद्राच्या कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेत विद्यार्थ्यांना आरोग्य व्यवस्थेतील महत्त्वाच्या बाबी समजावून सांगण्यात आल्या.


विद्यार्थ्यांनी आरोग्य केंद्रातील डॉक्टर आणि कर्मचारी वर्गाशी संवाद साधला. त्यांनी लसीकरण मोहिमा, मातृत्व व बाल संगोपन, आणि सर्वसामान्य आजारांवरील उपचार यांसारख्या सेवा कशा दिल्या जातात हे समजून घेतले.

या भेटीबाबत महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर म्हणाले, अशा प्रकारच्या भेटी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता आणि जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. ग्रामीण भागातील आरोग्यसेवेच्या महत्त्वाची जाणीव त्यांना होते. या भेटी चे आयोजन प्रा. पंकज भोये यांनी केले, त्यात प्रा. देवेंद्र कांबळे आणि प्रा. विशाखा पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले.

महाविद्यालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्र भविष्यात आरोग्य जागरूकता कार्यक्रम राबवण्यासाठी आणि सामूहिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करतील.



## उरण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.जी. लोणे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.आनंद गायकवाड उपस्थित होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकताना त्यांनी केलेला संघर्ष व स्त्री शिक्षणासाठी दिलेला लढा याविषयीचे सविस्तर विवेचन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आय क्यु ए सी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण हे होते. त्यांनी अध्यक्षीय समारोपात सावित्रीबाई फुले यांचे चरित्र समजून घेणे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य असून विद्यार्थ्यांनी त्यांच्यापासून आदर्श घेतला पाहिजे, असे सांगितले.

सूत्रसंचालन एनएसएस प्रमुख डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले. कार्यक्रमात डॉ. एच के जगताप, प्रा.रियाज पठाण, प्रा. निलोफर मुकरी, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. हन्नत शेख, प्रा. विनिता तांडेल, प्रा. रामकृष्ण ठावरे इतर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### कोकिलाबेन हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक थेरपीने रुग्ण बरा

**नवी मुंबई :** रिजेश आणि त्यांच्या कुटुंबियांना आक्रमक लिम्फोमाच्या रिलॅप्सने खूप मोठा धक्का दिला, पण कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबईमध्ये अभिनव CAR-T थेरपीने रिजेशना कॅन्सरपासून पूर्णपणे मुक्ती मिळवून दिली आणि त्यांचा जीव वाचवला.

नवी मुंबईमध्ये CAR-T थेरपी केली गेली आणि बदलण्यात आलेल्या CAR-T पेशींना त्यांच्या शरीरातील रक्तप्रवाहामध्ये सोडण्यात आले. CAR-T थेरपीमुळे घडून आलेला परिणाम हा निव्वळ एक चमत्कार होता. एका महिन्यानंतर पीईटी सीटी स्कॅनमध्ये समजले की, कॅन्सर पूर्णपणे बरा झाला होता आणि रिजेशच्या शरीरामध्ये लिम्फोमा आढळून आला नाही.

# सुषमा पाटील विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरातील शिक्षणाची भूक भागवण्याचे काम हे संकुल करत आहे, असे गौरोद्गार पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सुषमा पाटील विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनावेळी केले. तर माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत स्वतःला व्यक्त करता यायला पाहिजे. स्वतःला चांगल्या प्रकारे व्यक्त करता आले तरच आयुष्याच्या पुढच्या प्रत्येक पायरीवर आपण यशस्वी होऊ शकतो. त्यासाठी आपल्या मुलांना आपण प्रेरीत केल पाहिजे असा मोलाचा सल्ला दिला.





कामोठ्यातील सुषमा पाटील विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन अर्थात १२वा कामोठे कला, क्रीडा आणि सांस्कृतीक महोत्सव २०२५ मोठ्या उत्साहात शनिवारी झाला. या सोहळ्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत विविध सांस्कृतीक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. दरवर्षी हा महोत्सवा मोठ्या जल्लोषात साजरा होतो त्यानुसार यंदाही भव्य दिव्य असा सोहळा विद्यालयाच्या मैदानात झाला. या सोहळ्याला पनवेल विधानसभा मतदार संघाचे आमदार प्रशांत ठाकूर तसेच पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

या वेळी कार्यक्रमाचे आयोजक तथा माजी नगरसेवक दिलीप पाटील, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवि जोशी, माजी नगरसेवक विकास घरत, माजी नगरसेविका कुसूम म्हात्रे, हेमलता गोवारी, भाऊ भगत, दामोदर चव्हाण, रवि गोवारी, प्रकाश पाटील, युवामोर्चा कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव, मंदार मुंबईकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### क्लिक...क्लिक...!



**श्रीवर्धन : समुद्र किनारी सुर्यास्तावेळी आकाशात विविध रंगछटा निर्माण झाल्या होत्या. दरम्यान, रविवार असल्याने बीचवर पर्यटकांनी प्रचंड गर्दी केली होती.** (छाया : भरत चोगले)

## बीसीटी विधी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाने राष्ट्रीय दिन उत्सव समिती आणि आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग (DLLE) यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंतीनिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाचे नेतृत्व सहाय्यक प्राध्यापक संग्राम पवार यांनी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते. या कार्यक्रमाचा उद्देश महिला शिक्षणातील अग्रणी आणि भारताच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील प्रमुख व्यक्तिमत्व असलेल्या सावित्रीबाई फुले यांना आदरांजली अर्पण



करणे असा होता.

कार्यक्रमाची सुरुवात दिशा ढोणे यांच्या प्रेरणादायी सूत्रसंचालनाणे झाली. दीपप्रज्वलन सोहळ्याने फुले यांच्या वारशाचा गौरव करण्यासाठी प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी एकत्र आले. प्राचार्या सानवी देशमुख यांनी मुलींसाठी शाळा स्थापन करण्यासाठी फुले यांच्या क्रांतिकारी प्रयत्नांवर आणि अधिक समावेशक समाज निर्माण करण्याच्या त्यांच्या समर्पणावर प्रकाश टाकला. विधी महाविद्यालयातील सर्व महिला कर्मचारी सदस्यांचा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या उत्सवात महिलांसाठी शिक्षणाचा अधिकार या थीमवर वक्तृत्व स्पर्धादेखील आयोजित करण्यात आली होती. श्रुती चौबे हिने प्रथम, दिप्ती गायकवाड व वैदही वारे हिने अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. कार्यक्रमाची सांगता सुश्री रिचाप्रिया यांच्या आभारप्रदर्शनाने झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व सहभागी, कर्मचारी आणि आयोजक समितीने दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सर्वांसाठी, विशेषत: महिलांसाठी मूलभूत अधिकार म्हणून सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणाच्या दृष्टीकोनासाठी महाविद्यालयाच्या वचनबद्धतेची आठवण करून देणारा हा उत्सव ठरला.

# नेरळ येथे भात हमी भाव खरेदी केंद्र सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

मार्केटिंग फेडरेशनचे माध्यमातून भाताची हमी भावाने खरेदी करण्यात येते. त्यासाठी नेरळ येथील केंद्रावर भाताची हमी भावाने खरेदी केली. नेरळ, कळंब भागातील ४०० शेतकऱ्यांनी आपल्या भाताची विक्री करण्यासाठी नोंदणी केली आहे.

कर्जत तालुक्यात खरीप हंगामात सर्वाधिक पीक भाताचे घेतले जाते. यावर्षी सरत्या पावसामुळे भाताचे पीक शेतकऱ्यांच्या हातातून गेले आहे. पावसामुळे भाताच्या पिकावर आणि उत्पन्नावर मोठे परिणाम झाले आहेत. तरीदेखील शेतकऱ्यांनी भाताचे पीक गोळा करून साठवून ठेवले आहे. कर्जत तालुक्यात भाताची सर्वाधिक शेती केली जात असल्याने भाताचे पीक प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरात जमा होते. त्यामुळे कर्जत तालुक्यातील नेरळ सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांसाठी आणि कशेळे आदिवासी भागासाठी जी भाताची खरेदी केंद्र सुरू होणे आवश्यक आहेत. तशी मागणी शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदार यांच्याकडे केली होती. त्यानुसार नेरळ येथे नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी यांना मार्केटिंग फेडरेशन कडून अधिकार देण्यात आल्यावर आज भाताची हमी भावाने खरेदी केंद्र सुरू झाले.



नेरळ खांडा येथील ११०० क्विंटल क्षमता असलेल्या गोदामात भाताचे हमी भाव केंद्र सुरू झाले. या केंद्राचे उद्घाटन नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र विरले यांचे हस्ते विक्रीसाठी आलेल्या भाताचे पूजन करून झाली. त्यानंतर जेष्ठ संचालक नारायण तरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून भाताची खरेदी सुरू झाली. भाताची हमी भावाने विक्री करण्यासाठी आलेल्या पहिले शेतकरी कोल्हारे गावातील राहुल हजारे यांचे स्वागत संस्थेचे वतीने करण्यात आले. त्यावेळी उप सभापती रवींद्र झांजे, संचालक सावळाराम जाधव, शशिकांत मोहिते, नारायण तरे, यशवंत कराळे, विष्णू कालेकर, धोंडू आखाडे आदी उपस्थित होते. या वेळी शेतकरी मारुती विरले, राहुल हजारे, दत्ता सोनावले, दयानंद गवळी, सुशील कालेकर, भाऊ भोईर आदी उपस्थित होते.

## असे चालते कामकाज

नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटी यांना मार्केटिंग फेडरेशनकडून मान्यता देण्यात आली आहे. ३२ गावे असून त्याशिवाय तालुक्यातील अन्य गावातील शेतकरी हेदेखील भात विक्रीसाठी आणू शकतात. नेरळ सोसायटी हद्दीतील आतापर्यंत ४०० शेतकऱ्यांनी भाताची विक्री करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे. मागील वर्षी भाताचे पीक चांगले होते आणि त्यावेळी तब्बल १३०००क्विंटल भाताची खरेदी या केंद्रावर झाली होती. तुलनेत यावर्षी ऑनलाईन नोंदणीदेखील कमी झाली आहे. भात साठवून ठेवण्यासाठी मार्केटिंग फेडरेशन कडून कापडी बारदाणे मिळतात, मात्र यावर्षी केवळ ३००० बारदाणे मंजूर झाली असून पेण येथून टी आणावी लागणार आहेत. नेरळ येथील गोदाम पूर्ण भरल्यास कळंब येथील गोदाम उपलब्ध असल्याने तेथे देखील नंतर खरेदी केंद्र सुरू करता येणार आहे.

**या वर्षी शासनाने २०२४-२५ पीक पाणी नोंद झालेली नाही. त्यात अनेक शेतकरी यांना आधार लिंक नसलेले मोबाईल घेऊन शेतकरी येत असतात. त्यामुळे ऑनलाईन करण्यात अडचणी येत आहेत.**

**-विष्णू कालेकर, संचालक**

# खालापूर पोलिसांकडून रेझिंग डेनिमित्त जनजागृती

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलिस यांच्याकडून रेझिंग डेनिमित्त महिला बाल सुरक्षा वाहतूक नियमन यावर सायबर क्राईम यांनी जनजागृती कार्यक्रम आयोजित केला होता.



पहल नर्चरिंग लाईव्स कौशल्य प्रशिक्षण केंद्र, खालापूर व विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल, गोरठण बुद्रुक या दोन ठिकाणी खालापूर पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी पोलीस उप निरीक्षक अलोक खिसमतराव, हवालदार जगधने, भोईर, कांबळे, शिपाई पवार, शिंदे, गणेश चौधरी यांच्या समवेत भेट देऊन विद्यार्थ्यांशी व शिक्षकांशी संवाद साधला.

महिला व बालक सुरक्षा, वाहतुक नियमन, सायबर क्राईम गुन्हे व ते घडु नयेत याबाबत घ्यावयाची दक्षता याबाबत माहिती देऊन मार्गदर्शन केले. उपस्थित विदयार्थी व शिक्षकांना डायल ११२, पोलीस काका, पोलीस दिदी यांचे संपर्क क्रमांक देण्यात आले. सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांक, वेबसाईट बाबत माहिती देण्यात आली. तसेच त्यांना येणाऱ्या तक्रारी व समस्यांबाबत चर्चा करण्यात आली. त्यावेळी पोलीस ठाणे कडे असलेल्या शस्त्रांची ओळख करून देण्यात आली.

# मोरे महाविद्यालयात स्कूल कनेक्ट उपक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि मुंबई विद्यापीठाच्या आदेशानुसार एम बी मोरे महिला महाविद्यालय धाटाव रोहा येथे 'स्कूल कनेक्ट २.०' उपक्रमातर्गत पीएनपी माध्यमिक विद्यालय, तळाघर येथील विद्यार्थ्यांनी भेट दिली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार उच्च शिक्षणात होत असलेले बदल आणि त्यानुसार माध्यामिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या विषय निवडीबाबत शंकांचे निरसन करण्यासाठी 'स्कूल कनेक्ट २.०' हा उपक्रम राबविला जात आहे. यासाठी तळाघर, रोहा येथील पी एन पी माध्यमिक शाळेतील इयत्ता ९ वी आणि १० वी च्या ३८ विद्यार्थी आणि ०१ शिक्षक यांनी मोरे महिला महाविद्यालय येथे भेट दिली. या वेळी प्रा प्रसन्न म्हसळकर यांनी विद्यार्थांना स्कूल कनेक्ट २.० चे उद्दिष्ट समजावून सांगितले.

वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत 'वाचन पंधरवाडा'निमित्त या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या सभागृहात 'द फॅन्टॅस्टिक फ्लाईंग बुक्स ऑफ मिस्टर मॉरीस लेशमोर' हा लघुपट दाखविण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी हा यामागे उद्देश होता.

या भेटी दरम्यान पी.एन.पी शाळेच्या शिक्षिका सौ वैष्णवी मोंढे, मोरे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, ग्रंथपाल निर्मला थोरात, प्रा.माधुरी जाधव, लिपिक स्वागत पिंगळे उपस्थित होते.




# वाचन सप्ताहनिमित्त ग्रंथदिंडी

**मुरूड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरूड-जंजिरा येथे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले.

या दिंडीला महाविद्यालयाच्या आवारातून सुरुवात झाली. प्रभारी प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्याकार्माचा आयोजन करण्यात आला. शेवटी ग्रंथालय समिती प्रमुख प्रा. अलताफ फकीर यांनी ग्रंथ दिंडीच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला.

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ग्रंथपाल प्रा. अंजुम दाखवे, प्रा. जावेद खान, डॉ. फिरोज शेख आणि इतर शिक्षकवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. स्थानिक स्तरावर या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणावर कौतुक झाले असून, हा स्तुत्य उपक्रम वाचनसंस्कृतीला नवी दिशा देणारा ठरला आहे.



# नागाव येथे शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नागाव खारगल्ली येथे शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ कार्यक्रम शुक्रवारी (दि.३) झाला.

या वेळी शिवसेनेच्या सचिव व पक्ष प्रतोद विधान परिषदेच्या आमदार डॉ.मनिषा कायंदे व अलिबाग-मुरूड-रोहा विधानसभा मतदार संघाचे आमदार महेंद्र दळवी, शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाई केणी, उपजिल्हा प्रमुख शैलेश चव्हाण, शिवसेना तालुका प्रमुख अनंत गोंधळी, रेवदंडा ग्रा.प.सरपंच प्रफुल्लशेठ मोरे, विभाग प्रमुख मंगेश ठाकूर, जेष्ठ शिवसैनिक मनोहर ठाकूर, महिला पदाधिकारी संजीवनी नाईक, भाग्यता पाटील, तृप्ती पाटील, विधानसभा संघटिका तनुजा मोरे, शलाका राउत, अंकिता शेवडे, ज्योती मुंबईकर आदी प्रमुख पदाधिकारीसह शिवसेना कार्यकर्ते व खारगल्ली ग्रामस्थ, महिला व युवावर्ग यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन व निमत्रंक निखिल भाटकर यांनी केले होते.



प्रारंभी मान्यवर प्रमुख अतिथी आमदार मनिषा कोयंडे व आमदार महेंद्र दळवी यांचे स्वागत महिलावर्गानी औक्षण करून जल्लोषात व फटाक्याचे आतषबाजीने करण्यात आले. त्यानंतर दिपप्रज्वलन, प्रतिमा पुजन व शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ फित कापून मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या वेळी जनसंपर्क कार्यालयाच्या प्रांगणात स्वागत-सत्कार तसेच मान्यवराचें मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी निखिल भाटकर व पुजा भाटकर यांचे हस्ते मान्यवर अतिथी आमदार मनिषा कोयंडे व आमदार महेंद्र दळवी यांचे स्वागत व सत्कार शाल, श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून करण्यात आले तसेच उपस्थित इतर मान्यवर मंडळीना पुष्पगूच्छ प्रदान करून स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुरूवातीस रेवदंडा महिला शहर शिवसेना प्रमुख शलाका राउत यांनी प्रास्ताविक केले तर महिला संघटिका संजिवनी राउत यांनी प्रथम मार्गदर्शन केले. सुत्रसंचलनाचे गायकवाड यांनी उकृष्पणे सादरीकरण केले त्यांचे कौतुक आमदार मनिषा कोयंदे यांनी शेवटी केले. त्यानंतर नागाव खारगल्ली येथील नुतन रस्ता कॉक्रिटीकरण शुभारंभ आमदार मनिषा कोयंदे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.

## निवडक

### माणगाव येथे विज्ञान प्रदर्शन



**माणगाव :** माणगाव पंचायत समिती, अशोकदादा साबळे विद्यालय माणगाव व गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अशोकदादा साबळे विद्यालय, माणगाव येथे दोन दिवशीय विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन शुक्रवारी माणगाव प्रांताधिकारी डॉ. संदिपान सानप यांच्या हस्ते करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात ४९ तर माध्यमिक गटात ३३ उपकरणांची मांडणी करण्यात आली पहिल्याच दिवशी ७०० ते ८०० विद्यार्थ्यांनी हे प्रदर्शन पाहण्यासाठी सहभाग नोंदविला.

### उद्योजक विजय मेथा यांना पुरस्कार



**माणगाव :** येथील ज्येष्ठ उद्योजक तथा तालुका पत्रकार संघाचे जेष्ठ मार्गदर्शक खेमचंद (विजयशेठ) चुनीलाल मेथा यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल स्व. माजी आ.मधुशेठ ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट अलिबाग,भाई जगताप मित्रमंडळ रायगड, ॲड.उमेश ठाकूर मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विजयशेठ मेथा यांना कुलाबा जीवन गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

### दीपक पाटील यांना पुरस्कार



**मोहोपाडा :** चौक वावर्ले येथील दीपक गणपत पाटील यांना डब्ल्यूएमबीएन फाउंडेशन, छावा मराठा संघटना आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित मुंबई यांच्यावतीने मराठा उद्योजक मेळावा छत्रपती संभाजीनगर येथे झाला. दीपक पाटील हे कानसा वारणा फाउंडेशनचे संस्थापक आहेत. संस्थेच्या वतीने राज्याबाहेर तसेच महाराष्ट्र राज्यात विविध उपक्रम सुरू आहेत. या वेळी सुरेश चव्हाण मुख्य संपादक सुदर्शन व्युज चॅनल, शिवाजीराव जाधव सिंदखेड राजा लखोजीराव जाधव यांचे वंशज, नरेंद्र पाटील अण्णासाहेब आर्थिक महामंडळ अध्यक्ष अंकुशराव कदम एमजीएम' विद्यापीठ विश्वस्त, किशोर चव्हाण संस्थापक अध्यक्ष छावा आदी उपस्थित होते.

### सावित्रीबाई जयंती साजरी



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील राजिप शाळा विकास कॉलनी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने पालक व विद्यार्थ्यांना विद्यार्थी सुरक्षा व सायबर सुरक्षा याविषयी माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्री.काळे, श्री.चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल श्री.पवार, रामनाथ डोईफोडे यांनी मार्दर्शन केले. या वेळी मुलांनी सावित्रीबाईंच्या जीवनावर आधारित काव्य पंक्ती, ओव्या, गाणी, भाषण, एकांकिका सादर केली.

# जोगेश्वरी मातेच्या मंदिरात पूजा

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे गावाची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेचे मूळ स्थान असलेले नागोठण्याचे पूर्वेकडील डोंगर (घरळी) येथे शांती होम व श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन मंगळवारी (दि.७) सकाळी १० वाजता करण्यात आहे.

या वेळी पूजा विधी संपन्न झाल्यानंतर दुपारपासून मातेचा दर्शन सोहळा सुरु होणार असून तो रात्रीपर्यंत सुरू राहणार आहे. या महापूजेच्या निमित्ताने सायंकाळी ४ ते ७ वा. दरम्यान महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले आहे. तसेच सायंकाळी ६ ते ८ वा. दरम्यान संतसेवा मंडळ नागोठणे यांचा हरिपाठ होणार आहे. या भक्तिमय कार्यक्रमास समस्त भाविक, ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित राहून या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

हा धार्मिक सोहळा यशस्वी होण्यासाठी खडकआळी ग्रामस्थ मंडळ व महिला मंडळ तसेच ज्वाला ग्रुप खडकआळी मेहनत घेत आहेत.

# माणगाव तालुका पत्रकार संघ अध्यक्षपदी सलीम शेख

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील जेष्ठ पत्रकार सलीम मुबारक शेख यांची संघाच्या अध्यक्षपदी सलग आठव्यांदा एकमताने बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



माणगाव तालुका पत्रकार संघाची सभा नववर्षाच्या शुभमुहूर्तावर शनिवारी (दि.४) शासकीय विश्रामगृह माणगाव याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सभेत सन २०२५ या वर्षाकरिता नवीन कार्यकारणी सर्वानुमते निवडण्यात आली. त्यामध्ये पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील जेष्ठ पत्रकार सलीम शेख यांची सलग आठव्यांदा एकमताने बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. संघाच्या कार्यध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार प्रभाकर मसुरे, उपाध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार मजिद हाजिते, निलेश म्हात्रे, प्रवक्तेपदी संतोष गायकवाड, सचिव ज्येष्ठ पत्रकार सचिन देसाई, खजिनदार स्वप्ना साळुंके, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रसिद्ध उद्योजक खेमचंद मेथा, जेष्ठ सल्लागार आजेश नाडकर, तरुण मराठी उद्योजक सुभाषशेठ दळवी, कायदेशीर सल्लागार ॲड. केदार गांधी, कार्यकारिणी सदस्य सुप्रिया शिंदे अशी कार्यकारिणी सर्वानुमते निवडण्यात आली.

# खोपोलीत संविधानविषयक कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील वसंत देशमुख मेमोरियल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स या शाळेत ३१ डिसेंबरपासून एक आठवडा 'घर घर संविधान' अभियान राबविण्यात आले. शासन निर्णयांतर्गत संविधान गुण गौरव समितीमार्फत 'संविधान गुण गौरव' परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम शाळेच्या मुख्याध्यापिका सीमा नाईक व अश्विनी वाघुले यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व व संविधान गुणगौरव परीक्षेचे महत्त्व सांगण्यात आले.



संस्थेचे संस्थापक अध्यक्ष उल्हासराव देशमुख यांच्या समक्ष संविधान गुणगौरव परीक्षेला सुरुवात झाली. या वेळी शाळेतील लहान गटातून १८७ विद्यार्थ्यांनी व मध्यम गटातून २९४ विद्यार्थ्यांनी अशा एकूण ४८१ विद्यार्थ्यांनी संविधान गुणगौरव परीक्षा दिली. या परीक्षेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी पर्यवेक्षक म्हणून तर सुनील जाधव यांनी केंद्रप्रमुख म्हणून काम बघितले.

# ऑस्ट्रेलियाने बॉर्डर-गावसकर ट्रॉफी जिंकली

## पाचव्या कसोटीत भारताचा पराभव

**सिडनी : वृत्तसंस्था**

सिडनी कसोटीत यजमान ऑस्ट्रेलियाने भारताचा सहा विकेट्सनी पराभव करत पाच सामन्यांची कसोटी मालिका ३-१ अशा फरकाने खिशात घातली. यासह ऑस्ट्रेलियाने तब्बल दहा वर्षांनी बॉर्डर-गावसकर ट्रॉफीवर नाव कोरले. या सामन्यात भारतीय संघाने १६२ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने चार गडी गमावून मालिका विजयावर शिक्कामोर्तब केले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताने पहिल्या डावात १८५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १८१ धावांवर आटोपला, ज्यामुळे टीम इंडियाला चार धावांची आघाडी मिळाली. यानंतर भारताचा दुसरा डाव १५७ धावांत संपुष्टात आला आणि ऑस्ट्रेलियाला १६२ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने ट्रॅव्हिस हेड (३४) आणि वेबस्टर (३९) यांच्या नाबाद खेळीच्या जोरावर विजय मिळवला.



तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाने सॅम कॉन्स्टास (२२), उस्मान ख्वाजा (४१), मार्नस लॅबुशेन (६) आणि स्टीव्ह स्मिथ (४) यांच्या विकेट गमावल्या होत्या. यानंतर ट्रॅव्हिस हेड आणि ब्यू वेबस्टर यांनी ४६ धावांची नाबाद भागीदारी करून ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला. दुसऱ्या डावात कर्णधार जसप्रीत बुमराह पाठीच्या दुखापतीमुळे संघाबाहेर झाला. त्याच्या जागी विराटने नेतृत्व केले. भारताकडून प्रसिध कृष्णाने तीन गडी बाद केले, तर सिराजला एक विकेट मिळाली.

### 'कांगारूं'ची डब्ल्यूटीसी फायनलमध्ये धडक

पाचव्या कसोटीत विजय मिळवून ऑस्ट्रेलियाने बॉर्डर-गावसकर ट्रॉफी जिंकण्याबरोबरच जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेच्या फायनलमध्ये धडक मारली आहे, तर पराभवामुळे भारतीय संघ डब्ल्यूटीसी फायनलच्या शर्यतीतूनही बाहेर झाला. याआधी दक्षिण आफ्रिका डब्ल्यूटीस फायनलसाठी पात्र ठरली होते आणि आता फायनलमध्ये पोहचणारा ऑस्ट्रेलिया हा दुसरा संघ ठरला आहे.

# रोह्याच्या राज मोरेची महाराष्ट्र कबड्डी संघात निवड

**धाटाव : प्रतिनिधी**



५०व्या राष्ट्रीय कुमार गट अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडण्यात आला असून यामध्ये रोहा येथील जय बजरंग संघाचा अष्टपैलू खेळाडू राज मोरे याची निवड झाली आहे. राष्ट्रीय स्पर्धा ८ जानेवारीपासून उत्तराखंड येथे खेळली जात आहे.

सांगली येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद कुमार गट कबड्डी स्पर्धेत रायगड संघाने तृतीय क्रमांक पटकावला. या संघाचे नेतृत्व राज मोरेने केले होते. राजने मागील वर्षीदेखील रायगडचे प्रतिनिधित्व केले होते व तो रायगडच्या युवा लीगच्या संघातदेखील होता.

राजची महाराष्ट्र कुमार गट कबड्डी संघात झालेली निवड कौतुकास्पद असून जय बजरंग रोहा क्रीडा मंडळाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दरम्यान, भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांनी राजचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# महाड मॅरेथॉनला धावपटूंचा प्रतिसाद

**महाड : प्रतिनिधी**

महाड स्पोर्ट्स क्लबतर्फे महाड शहरामध्ये मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. ५) करण्यात आले होते. जवळपास २४० स्पर्धकांनी सहभागी होत स्पर्धेस उत्तम असा प्रतिसाद दिला. दरम्यान, या वेळी महाड पोलीस उपविभागीय अधिकारी शंकर काळे यांनी महाडमध्ये हॅप्पी स्ट्रीटची संकल्पना मांडली.

काही शहरांमध्ये फक्त व्यायाम व फिरण्यास येणाऱ्यांसाठी हॅप्पी स्ट्रीट (आनंदी मार्ग) केले जातात. महाड हे तर सुखी व आनंदी वातावरण असलेले शहर आहे. त्याच धर्तीवर महाड शहरामध्येदेखील या हॅप्पी स्ट्रीट निर्मितीसाठी पोलीस प्रशासन नक्कीच सहकार्य करेल, असे प्रतिपादन महाड तालुका उपविभागीय पोलीस अधिकारी शंकर काळे यांनी मॅरेथॉन स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात केले.

महाड स्पोर्ट्स क्लबतर्फे महाड शहरामध्ये प्रथमच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास २४० स्पर्धकांनी सहभागी होत प्रतिसाद दिला. स्पर्धेची महिला व पुरुष अशा दोन गटांसह तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटर अंतर अशी विभागणी करण्यात आली होती.

बक्षिसांसाठी पाच किलोमीटरची स्पर्धा ही मुख्य स्पर्धा होती. यामध्ये केशरी जर्सी परिधान केलेले ७० स्पर्धक. तर तीन किलोमीटरसाठी निळ्या जर्सीमध्ये ड्रीम रन या संकल्पनेतून १७० स्पर्धक सहभागी झाले होते. सकाळी ६ वाजता चवदारतळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह इथून स्पर्धेला सुरुवात झाली. डीवायएसपी शंकर काळे, पद्मश्री डॉ. हिंमतराव बावस्कर, डॉ. रमेश नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. तांबट आळीमार्गे मुख्य बाजारपेठेतून थेट नवेनगर पुढील म्हाडा मैदानाजवळून वळसा घेऊन भगवानदास बेकरीमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पुन्हा चवदारतळे असे स्पर्धेचा मार्ग होता.

पुरुष गटातून राज सचिन जाधव प्रथम, अभिजीत सुंभे द्वितीय व दर्शनराजे महाडिक याने तृतीय क्रमांक; तर महिला गटातून आकांक्षा बारणे प्रथम, स्मृती जाधव द्वितीय व शुभांगी निकम हिने तृतीय क्रमांक पटकावला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या वेळी पद्मश्री डॉ. बावस्कर यांनी व्यायाम आरोग्यासाठी किती उपयुक्त आहे याबाबत मार्गदर्शन केले.

केवळ आठव्या वर्षी रायगड जिल्ह्यातील विविध मॅरेथॉन स्पर्धांमधून उल्लेखनीय कामगिरी केलेल्या पूजा सावंत हिचा तसेच देशसेवा करणाऱ्या सैनिक दलातील स्पर्धकांचादेखील यथोचित सन्मान करण्यात आला. व्यासपीठावर प्रमुख मान्यवरांसह डॉ. सीमा रानडे, मीनल शेठ यांचीही उपस्थिती होती. महाड स्पोर्ट्स क्लबच्या डॉ. सोनिया नगरकर आणि निरंजन यादव यांच्या संकल्पनेतून प्रथमच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी सिस्केप महाड, सह्याद्री मित्र, व्ही जीम, एनसीसी आदी संस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

सूत्रसंचालन राकेश मेहता यांनी केले. प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेमध्ये राहिलेल्या त्रुटी पुढील वर्षी निश्चितपणे यापेक्षाही उत्तम नियोजन व आयोजनाने दूर करण्याचा विश्वास डॉ. सोनाली नगरकर यांनी व्यक्त करून स्पर्धेसाठी सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार मानले.

सात वर्षांच्या बालकापासून ते ७५ वर्षांच्या ज्येष्ठांपर्यंत धावपटूंनी या स्पर्धेत सहभागी होऊन स्पर्धेचा आनंद घेतला आणि स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाड स्पोर्ट्स क्लबला धन्यवाद दिले.



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये क्रीडा संमेलन






**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

शालेय शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा क्षेत्रालाही विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वार्षिक क्रीडा संमेलनाच्या बक्षीस विरतण समारंभावेळी केले.

'रयत'च्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये तृतीय वार्षिक क्रीडा संमेलनाचे आयोजन रविवारी (दि. ५) करण्यात आले होते. या संमेलनाचे उद्घाटन स्कूलचे चेअरमन तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकास करायचा असेल तर प्रत्येक खेळामध्ये तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घ्यावा, असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी त्यांच्यासमोर विविध प्रत्यक्षिके सादर केली. यात पाचवीच्या विद्यार्थ्यांनी फ्लॉवर ड्रिल फॉर्मेशन, तिसरीच्या विद्यार्थ्यांनी लेझीम सादर करून मने जिंकली. पूर्व प्राथमिक ते पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनीदेखील मनमोहक सादरीकरण केले. स्वसंरक्षण करण्यासाठी कराटेचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. संमेलनामध्ये विद्यार्थ्यांसोबतच पालकांनीदेखील सहभाग घेतला. त्यांच्यासाठी रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या क्रीडा संमेलनाचे बक्षीस वितरण समारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी त्यांनी विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन त्यांचा गुणगौरव केला.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र डेव्हलोपमेंट कमिटीच्या चेअरमन तथा आणि मुंबई अर्चिरी विभागाच्या सेक्रेटरी पुनम महात्मे, 'रयत'च्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, लाईफ मेंबर रवींद्र भोईर, पीआरओ बाळासाहेब कारंडे, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूल कमिटीचे सदस्य निलेश खारकर, धीरज ओवळेकर, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, दीपाली म्हात्रे, सुपाली जंगम, नयन जंगम यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com